मधुराद्वैताचार्य श्रीगुलाबरावमहाराजांचा

विज्ञान-विचार

रु. १०

(२)

श्रीगुलाबरावमहाराज : जीवनकाय

(इ.स. १८८१ ते १९१५)

''युक्तीने पटवून देण्याचा माझा बाणा आहे''

प्रज्ञाचक्षू श्रीगुलाबरावमहाराज म्हणजे विदर्भातील माधानचे गुलाब गुंडोजी मोहोड. चवथ्या महिन्यात नेत्रहीन, माधान-खेड्यातील जीवन, शिक्षणाचा अभाव आणि आयुष्य केवळ ३४ वर्षे ! अशी सर्वतः विपरीत परिस्थिती असूनही महाराजांनी केलेल्या ग्रंथलेखनरूप ज्ञानयज्ञाचे कार्य अजोड आहे.

श्रीमहाराजांची श्रीकृष्णाचे ठिकाणी माधुर्यभक्ती असल्यामुळे ते स्वतःला ज्ञानेश्वरकन्या आणि कृष्णपत्नी म्हणवीत.

श्रीमहाराजांनी ''श्रीज्ञानेश्वर मधुराद्वैत संप्रदाय'' प्रवृत्त केला. हा नाथसंप्रदाय असून उपास्यत्वेकरून वारकरी पंथाची शाखा आहे.

संतांची ज्ञानोत्तर पराभक्ती आणि शंकराचार्यांचा अद्वैत वेदान्त यांचा समन्वय करून शास्त्रीय खंडनमंडन पद्धतीने भक्तिशास्त्राची नवीन स्वरूपात मांडणी केली.

भगवंताचा सगुण विग्रह मिथ्या नसून सच्चिदानंदघन शुद्ध ब्रह्मस्वरूप आहे. तो ज्ञानानेही नाश पावत नाही, यासाठी अगदी नवीन शब्दयोजना सुचवून शंकराचार्यांच्या अद्वैतात

(३)

'अनध्यस्तविवर्त' या भक्ति-संकल्पनेचे नवे योगदान दिले.

जगातील सर्व धर्मांत आणि हिंदुसमाजातील विभिन्न घटकात परस्पर द्वेष वाढू नये म्हणून महाराजांनी समर्थ असा सर्वधर्मसमन्वयाचा मूलगामी सिद्धान्त जगापुढे मांडला. आणि आर्य-अनार्य, आर्य-दस्यु, आर्य-द्रविड, ब्राह्मण-ब्राह्मणेतर, उत्तर-दक्षिण, इत्यादि द्वेषभावनेला आणि त्यामुळे उत्पन्न झालेल्या असंतोषाला मूठमाती देण्यासाठी समन्वयरूपी प्रभावी हत्यार विचारवंतांच्या हाती दिले.

* शांकर अद्वैत आणि भक्तीचा पूर्ण समन्वय.
* भक्तिशास्त्राची निर्मिती.
* भक्तीच्या नव्या १६ प्रकारांची मांडणी.
* ज्ञान, उपासना आणि भक्तीतील भेदविवेचन.
* माधुर्यभक्तीवरील आक्षेपांचे निराकरण आणि तिच्या सर्वोतेचे शास्त्रीय प्रतिपादन.
* नाममहात्म्य अर्थवाद आहे या आरोपाचे सविस्तर खंडन.
* योगी, ज्ञानी व भक्त यांच्यातील सूक्ष्म भेदांचे प्रतिपादन.
* समन्वयाच्या नऊ प्रकारांचे विवेचन.
* षड्दर्शने परस्परविरोधी नसून परस्परपूरक आहेत याची नवीन संदर्भात मांडणी.
* सांख्य सेश्वर आहे याची सप्रमाण सिद्धी.
* आधुनिक योग्यांच्या कुण्डलिनी-चक्रे-नाड्यांसंबंधी चुकीच्या संकल्पनांचे खंडन.
* योगदर्शनात अनेक नवीन प्रक्रियांची निर्मिती.

(४)

* स्वप्नातून परमार्थ प्राप्तीची प्रक्रिया.
* आन्तर् आणि बाह्य समाधीचे नवे मूलगामी विवेचन.
* पूर्वमीमांसेचे काही अंशी खंडन व उत्तरमीमांसेसाठी तिचा उपयोग.
* उत्क्रांतिवाद, अणुवाद, अज्ञेयवाद, संशयवाद वगैरे पाश्चात्य तत्त्वज्ञानांची भारतीय सिद्धांताशी तुलना आणि मूल्यमापन.
* नीतिशास्त्रातील युरोपियन मतांचे खंडन. त्यांचा भारतीय नीतीशी वेगळ्या रीतीने समन्वय आणि दैनंदिन सदाचाराचा उपदेश.
* पाश्चात्य आणि भारतीय मानसशास्त्रांशी तुलना.
* ॲलोपॅथी व आयुर्वेदाची तुलना आणि मानसायुर्वेदाची निर्मिती.
* इस्लाम, ईसाई, पारशी, बौद्ध, जैन, वगैरे सर्व वैदिक धर्माच्या शाखा आहेत या सिद्धान्ताचे प्रमाणपुरस्सर शास्त्रशुद्ध विवेचन.
* वर्णाश्रम व्यवस्थेचे मूल्यमापन.
* ब्राह्मण-ब्रह्मणेतरवाद आणि आर्य-अनार्य वादांसंबंधी तौलनिक विवेचन.
* बुवाबाजीचा दंभस्फोट.
* धर्मसंकर, धर्मसुधारणा आणि धर्मसमन्वय यातील भेद विवेचन.
* वेदांवर आणि पुराणांवर समन्वयात्मक सूत्रग्रंथांची रचना.

(५)

तत्त्वज्ञानांचे मूळ स्त्रोत असत्याचे युक्तिसिद्ध प्रतिपादन.

* न्याय वैशेषिकातून प्राचीन आर्यांचे भौतिक विज्ञान कसे विकसित करावे, याचे मार्गदर्शन.
* मनोविज्ञान, काव्यशास्त्र, संगीत, आयुर्वेद वगैरे शास्त्रांची षड्दर्शनानुसार प्रस्तुती.
* इतिहास कोणी कसा लिहावा, आणि कोणत्या इतिहासावर विश्वास ठेवावा; याचे मार्गदर्शन.
* ''आर्य वंश नाही, आर्य बाहेरून आले नाहीत, शूद्र वर्ण हा आर्यांचाच भाग आहे'' या ऐतिहासिक सत्याचे मुद्देसूद प्रतिपादन : उत्तरध्रुवीय मताचा परामर्श.
* ''तीन हजार वर्षांपूर्वी आर्य संस्कृती विश्वव्यापक होती'' या ऐतिहासिक सिद्धान्ताची पुनर्स्थापना.
* डार्विन, स्पेन्सर, ॲनीबेझंट वगैरेंच्या उत्क्रांतिवादाचे खंडन.
* सुधारणा आणि बहुमत यांचे संबंधी परखड विचार.
* शिक्षणासंबंधी मूलभूत विचार.
* प्राचीन व अर्वाचीन संगीताची तुलना, भातखंडेंचे खंडन व तात्त्विक प्रश्नांचा उहापोह.
* प्राचीन सूत्र कायम ठेवून नवीन साहित्यशास्त्राची निर्मिती.
* ''प्रक्षिप्त आणि भाषाभिन्नतेवरून लेखकभिन्नता'' हे आधुनिक संकेत संत-साहित्याला किंवा आर्ष-वाङ्मयाला लागू पडत नाहीत याचे स्वतःच्या उदाहरणावरून प्रतिपादन.

(६)

* कौटुंबिक व सामाजिक संबंधात प्रश्नोत्तर रूपाने मार्गदर्शन.
* मुलांसाठी उपदेश. * स्त्रीगीतांची निर्मिती.
* लोकगीतातून समाजप्रबोधन.
* नवीन १२३ मात्रावृत्तांची रचना.
* नवीन लघुलिपीची (सांकेतिकलिपी) निर्मिती.
* नवीन 'नावंग' भाषेची निर्मिती.
* नवीन व्याकरण सूत्रे.
* आत्मचरित्र लेखन. * नाटक लेखन. * १७ आख्यानांची रचना.
* खेळातून परमार्थप्राप्तीची प्रक्रिया : मोक्षपट.
* संस्कृत, हिंदी, मराठी, वऱ्हाडी व व्रजभाषेत एकूण लहानमोठ्या १३९ ग्रंथांची रचना.
* पत्रे-११८ *अभंग-२०९९, *पदे-२२५२, *गीत-१२५०, * श्लोक – १०००,
* ओव्या – २३०००, *एकूण पृष्ठे ६०००.

बालपणी नवव्या महिन्यात नेत्रहीन झालेल्या महाराजांच्या केवळ ३४ वर्षाच्या अल्पायुष्यात अनेक ज्ञानशाखांना कवेत घेणाऱ्या योगदानाचा विचार केला असता- अल्पवयात अजोड कार्य करणाऱ्या पूज्यपाद श्री आद्यशंकराचार्य व श्रीज्ञानेश्वर महाराज यांचीच आठवण येते आणि भारतातील महर्षी भगवान् श्रीव्यासांच्या सर्वस्पर्शी ज्ञानपरंपरेचा स्त्रोत अखंड असल्याची जाणीव होते. ०००

(७)

मधुराद्वैताचार्य श्रीगुलाबरावमहाराजांचा

विज्ञान-विचार

पाश्चात्य प्रमेयांची समीक्षा

(प्रास्तविक - (१) उत्क्रांतिवादाची समीक्षा : डार्विनचे मत- जगाच्या मूळ कारणाची मीमांसा, - जीवपेशीसंबंधी उत्क्रातीची मीमांसा- अणुपासून उत्क्रांती होऊ शकेल काय? - (२) स्पेन्सरमत खंडन - ज्ञानाचे अणू असंभव - जडापासून जीवोत्पत्ती?- जगताचे कारण असमर्थ की समर्थ? सान्त की अनंत? - उत्क्रांति सान्त की अनंत? - १- उत्क्रांती व पुनर्जन्मातील भेद, थिऑसफीचा उत्क्रांतिवाद - २- उत्क्रांतीवाद व परिणामवाद - ३- अज्ञेयवाद आणि उत्क्रांती व अपक्रांती - स्पेन्सरच्या अज्ञेयवादाची समीक्षा - आन्तर्पदार्थ - बाह्य पदार्थ - अनंत हे अभावरूप नाही अज्ञेयही नाही - अज्ञेयवाद व अनादिवाद - संशयवाद - समारोप)

(श्रीगुलाबरावमहाराजांची विचारसंपदा या कृ.मा.घटाटेलिखित प्रबंधातून)

(८)

प्रास्तविक

श्रीगुलाबरावमहाराजांनी केलेल्या पाश्चात्य तत्त्वविचारधारांच्या मूल्यमापनाला एक वेगळा आयाम आहे. महाराजांच्या काळी भारतीय मनाची वैचारिक बैठक अगदी खिळखिळी होऊन गेली होती. त्याची कारणमीमांसा पाहून नंतर महाराजांच्या कर्तृत्वाकडे लक्ष दिल्यास त्यांच्या कार्याचे महत्व लक्षात येण्यास मदत होईल म्हणून त्याचा किंचित् आढावा घेणे अगत्याचे आहे.

ब्रिटीश राजवटीच्या पूर्वीपासून ख्रिस्ती लोकांनी स्वतःचा धर्म आणि राज्य स्थापण्यासाठी कशा कशा योजना आखून त्या सफल केल्या ते पाहणे मनोरंजक आहे.

पाश्चात्य ख्रिस्ती मिशनरी लोकांनी आपल्या संस्कृतीचे मूळ पाहून त्यावरच प्रहार केले आहेत. लॉर्ड मेकॉले, मॅक्समूलर वगैरेंचे खाजगी पत्रव्यवहार पाहिले तर त्यावरून त्यांचे मूळ उद्देश काय होते, त्यासाठी त्यांनी कोणते प्रयत्न केले आणि त्यांत ते

(९)

कसे यशस्वी झाले, यासंबंधी सर्व इतिहास, आपण थोडा विचार केला तर, सुस्पष्ट रीतीने दिसून येतो. एकदा मद्रासला एक ब्रिटिश ऑफिसर आणि त्याचा एक ब्राह्मण क्लार्क एका कार्यक्रमासाठी जात असता गावातल्या बड्या लोकांनी युरोपियन अधिकाऱ्याला हस्तांदोलन केले आणि ब्राह्मणाला साष्टांग नमस्कार केला. (अशी परिस्थिती ब्रिटिशांच्या सुरवातीच्या काळात आपल्या हिंदुस्थानात सर्वत्र होती.) अशा क्षुल्लक वाटणाऱ्या घटनेवरून राजनीतीत निष्णात असलेल्या ब्रिटीशांनी योग्य तो धडा घेतला. त्यांनी ठरविले की हिंदुमनावरची धर्मसत्ता उखडून टाकली तरच आपल्याला निरंकुशपणे राज्य करता येईल आणि ख्रिस्ती धर्माचा प्रसार करता येईल. म्हणून त्यांनी सर्वात जास्ती महत्व शिक्षणाला दिले. शिक्षणाची नवीन नीती अवलंबिली. त्यांनी जुन्या पाठशाळांची अनुदाने बंद केली. इंग्रजी शिकणाऱ्यांना ज्ञा नोकऱ्या आणि मानाच्या पदव्या देऊ केल्या. आपोआप बुद्धिमान वर्ग इंग्रजी शिक्षणाकडे आकृष्ट झाला आणि हळू हळू संस्कृत शिक्षणाचे महत्व

(१०)

कमी झाले. परंतु ब्रिटीशांच्या काळात कॉलेजपर्यंत संस्कृत आवश्यक विषय होता कारण त्यामुळेही ब्रिटीशांची गुणग्राहकता कशी श्रेष्ठ आहे, हेच भारतीय जनमानसावर प्रतिबिंबित होत असे.

या सर्वांचा साकल्याने असा परिणाम झाला की **मेकॉलेच्या इच्छेप्रमाणे भारतीय लोकांनी आपल्या तर्ककठोर न्यायदर्शन पद्धतीने अभ्यास करणे सोडून दिले**. ब्रिटिश सत्तेचे आणि युरोपियन बुद्धीचे गोडवे गाणे सुरू केले. आणि शेवटी ब्रिटिशांनी हिंदुस्थान सोडल्यावरही पाश्चात्य संस्कृतीच भारतीयांची आदर्शभूत होऊन राहिली. आचार विचार राहणी वगैरे सर्व बाबतीत आपण त्यांच्याकडेच पाहू लागले. **स्वातंत्र्य मिळाल्यानंतरही संस्कृतचे व न्यायवैशेषिक शास्त्रांसारख्या जुन्या आर्यभौतिक शास्त्रांचे पुनरुज्जीवन होण्याऐवजी संस्कृत भाषेलाच शाळा कॉलेजातून बहिर्भूत व्हावे लागले.** पूर्वी आपण भारतीय लोक न्यायशास्त्रातील तर्कपद्धतीचा अवलंब करून सर्व नवविचारांचे परीक्षण करीत असू आणि नंतर ते

(११)

ग्राह्य आहे की नाही हे ठरवीत असू. परंतु इंग्लिशांनी या शास्त्रांविषयीची आपली पूज्यबुद्धी नष्ट केली. धर्मभावना ही अफूची गोळी आहे हे साम्यवाद्यांनी शिकविले. एकूण काय तर सर्व ''अँटी हिंदू'' प्रवृत्तींनी आपली बुद्धी भ्रष्ट करण्यात यश मिळविले. या सर्वांचा संकलित परिणाम असा झाला की आपण पाश्चात्य तत्त्वचिंतकांचे निम्न पातळीवरील विचार देखील अंधश्रद्धेने जसेच्या तसे स्वीकारले. परंतु त्यांची देशभक्ती, शिस्त, कष्टाळूपणा आणि भौतिक शास्त्रातील प्रगती ही मात्र घेतली नाहीत. त्यातीलच एक महत्वाची गोष्ट म्हणजे **आपण सुशिक्षितांनी डार्विनप्रणीत उत्क्रांतिवादाचे भोंगळ युक्तिवाद स्वतःची बुद्धी यत्किंचितही न वापरता अंधश्रद्धेने ग्रहण केले.** एकूण काय तर जेथे विशुद्ध विचारांचे निकष लावून पडताळून पाहावयास हवे तेथे अंधश्रद्धा ठेवली आणि जेथे युक्तीची गरज नाही ते चांगले गुण मात्र मुळीच स्वीकारले नाहीत. असो. या उत्क्रांतिवादाचा आपण जिथे तिथे वाटेल तसा उपयोग करू लागलो. मानवी इतिहास

(१२)

असो की इतर शास्त्रे असोत उत्क्रांतिवादानुसार उपपत्त्या लावू लागलो. परंतु उत्क्रांतिवादाचे प्रामाणिकपणे निरीक्षण केले तर परिस्थिती वेगळीच असल्याचे जाणवते.

आपले पूर्वज शरीराने कणखर होते. त्यांचे आयुर्मान जास्त होते. पूर्वी सामान्य लोकात देखील सत्यप्रियता, परोपकारबुद्धी, दया, श्रद्धा, शांतता, प्रेम इत्यादी अनेक गुण होते. आजही नवशिक्षणाचा संस्कार न झालेल्या हिमालयातील जमातीत चोरीचपाटी, खोटे बोलणे वगैरे दुर्गुण सांपडत नाहीत. परंतु जे स्वतःला उत्क्रांत समजतात त्या सुशिक्षितांमध्ये तर हे सर्व दुर्गुण विपुल प्रमाणात आढळतात. **'नीतिनियम हे मूर्खांना वळण लावण्यासाठी आहेत'** असे ते गृहीत धरतात. मॉडर्न सोसायटीत कामाला स्वाभाविक भूक समजून त्यानुसार स्वैर वागणे हीच ज्ञाभ्रू लोकांची नीती समजली जाते. याप्रमाणे स्वैराचार आणि सर्व मर्यादांतून मुक्त होण्याची चळवळ मानवाला

जंगली श्वापदांच्या पंक्तीत पुनः नेऊन बसविणार असल्याची स्पष्ट चिन्हे आतांच दिसू लागली आहेत असे म्हणावयास हरकत नाही. याचाच अर्थ उत्क्रांतिवाद पूर्णपणे खोटा ठरला आहे. आपला आर्यांचा **'परिवर्तनवाद'** म्हणजेच **'संसाराचा चक्रनेमिक्रम'** हाच जगताविषयी खरा ठरेल यात संशय नाही.

आपला **आर्यांचा उत्क्रांतिवाद प्रायत्निक आहे, पाश्चात्यांप्रमाणे स्वाभाविक नाही. प्रयत्न केला तरच जीव नराचा नारायण होईल आणि वासनेप्रमाणे वाहवत गेला तर नराचा नरपशू होईल.** हेच सनातन तत्त्व आर्यतत्त्वज्ञानात मांडले गेले आहे. श्रीगुलाबराव महाराजांच्या समयोपदेश, अलौकिक व्याख्यानमाला व पत्रे इ. ग्रंथातून हा विषय विस्ताराने आला आहे. त्यांत डार्विन, स्पेन्सर, ॲनी बेझंट वगैरेंच्या मतातील विचारांचा उथळपणा युक्तिवादाच्या परखड रीतीने दाखवून दिला आहे.

१- उत्क्रांतिवादाचे समीक्षण

डार्विनने 'ओरिजीन ऑफ स्पेसीज' या ग्रंथात आपला उत्क्रांतिवाद इ.सन १८५८ मध्ये मांडला. त्यात 'स्ट्रगल फॉर एक्झिस्टन्स' आणि 'सरव्हायवल ऑफ दि फिटेस्ट' या महत्वाच्या सूत्रांभोवती सर्व उत्क्रांतिवादाचे तत्त्वज्ञान सजविले.

डार्विनचे मत

पूर्वी मासा होता नंतर त्याचेच माकड झाले व आज तोच माणूसरूपाने दिसत आहे. म्हणजे माणसाचे पूर्वज माकड होते. त्याचप्रमाणे पृथ्वी पहिले वायुरूप होती नंतर ती घनरूप झाली आणि या सर्वांचे कारण काही तरी एक आहे, असे डार्विनचे म्हणणे असल्याचे दिसते.

१) जीवंत वस्तूंची प्रजोत्पादन शक्ती ही उत्क्रांतीस पुढे रेटणारी असून

२) त्यांच्यातील बदलशक्ती भिन्न भिन्न तऱ्हेचे प्राणी व वनस्पती उत्पन्न करून या शक्तीस खाद्य

पुरवीत असते.

३) परंतु उत्क्रांतीची दिशा ठरविण्याचे महत्वाचे काम मात्र स्वाभाविक संवरणच (नॅचरल सिलेक्शन) करीत असते. असे थोडक्यात डार्विनचे तत्व आहे.[१]

या डार्विनच्या उत्क्रांतिवादावर महाराजांनी भारतीय न्यायशास्त्राच्या कठोर तार्किक पद्धतीने अनेक तर्क उपस्थित केले आहेत. आपल्या भारतीय विचाराप्रमाणे सृष्टीचा क्रम ''चक्रनेमिक्रम'' असतो. केवळ उत्क्रांती किंवा केवळ अपक्रांती मानता येत नाही, असे महाराजांनी केवळ तर्काच्या कसोटीवर दाखवून दिले. प्रत्येक जीव उत्क्रांत होऊ शकतो आणि अपक्रांतही होऊ शकतो. पण जीवाने कसून प्रयत्न केला तर मात्र त्याची केवळ उत्क्रांती होऊन तो नराचा नारायण होतो, हे निव्वळ 'प्रयत्नवादी तत्त्व' डार्विनच्या 'स्वाभाविक नैसर्गिक उत्क्रांतिवादापेक्षा' कितीतरी पटीने ज्ञा दर्जाचे आहे.

जगाच्या मूळ कारणाची मीमांसा

१) सर्व सृष्टीचे एकच कारण असेल तर ते उपादान कारण की निमित्त कारण?

(अ) जर ते निमित्त कारण असेल तर ते उपादान कारणापेक्षा वेगळे असले पाहिजे आणि ते वेगळे असेल तर त्या निमित्त कारणाची उत्क्रांति होण्याचे काहीच प्रयोजन नाही.

(आ) जगाला निमित्तकारण नसून केवळ उपादान कारण हेच एक कारण (घटामध्ये माती उपादानकारण व कुंभार निमित्तकारण) असेल तर ते कोणते? त्याचे ठिकाणी उत्क्रांतीचे सामर्थ्य कोठून आले? बाहेरून आले म्हटले तर ते निमित्त कारण होईल व उपादान कारणाहून वेगळे मानावे लागेल. मग त्या कारणाला निसर्ग म्हणा की ईश्वर म्हणा.

२) उत्क्रांतीचे सामर्थ्य कारणामध्ये स्वाभाविकच आहे, असे म्हटले तर जगातील पूर्वीच्या, आज असलेल्या व पुढे होणाऱ्या सर्वच गोष्टी बीजरूपाने कारणात अनादी असल्याच पाहिजेत. (फिजिक्सचा

(१७)

व गीतेचा असा सिद्धांतच आहे की कोणत्याही पदार्थाचा आत्यंतिक नाश होत नाही किंवा अगदी नवीन अशी गोष्ट उत्पन्न होत नाही. फक्त बदल होत असतो- जसे **'मेणबत्ती जळून जाते पण काहीच नाश पावत नाही.'**
'नासतो विद्यते भावो, नाभावो विद्यते सतः।'

३) सर्वच गोष्टी जगताच्या कारणात बीजरूपाने किंवा शक्तिरूपाने अनादी असल्या तर त्या सर्वांचीच सारखीच उत्क्रांती व्हावयास हवी, ती कां होत नाही? हल्ली जे प्राचीन हाडांचे सांपळे (फॉसिल्स) सांपडतात त्यांच्यापेक्षा आपले शरीर कितीतरी लहान आहे म्हणजे शरीराची उत्क्रांती न होता अपक्रांती झालेली दिसते.

४) डार्विनने एके ठिकाणी म्हटले आहे की ''माणसाची स्तुतिप्रियता हा गुण हळू हळू नाहीसा होऊन बुद्धीची वाढ होईल.''

यावर महाराज असे विचारतात की स्तुतिप्रियत्व व कर्तव्यशक्ती हे एकाच मनाचे गुण असून एकाचा ऱ्हास व एकाची उत्क्रांती कां व्हावी?

(१८)

५) जगताचे कारण एकच मानावयाचे व त्यातही इतकी विविधता मानावयाची तर मग त्या विविधतेपैकी कांही गुणांना प्रतिबंध करणारी शक्ती कोणती? तेही सांगावयास हवे.

ती शक्ती बाहेरचीच मानणे भाग आहे. अशी ही निमित्तकारणरूप बाह्य शक्ती कोणती? निसर्ग की ईश्वर?

६) उत्क्रांती कारणासहित शक्तीची होते की निव्वळ शक्तीची होते?

७) कारणासहित होते असे मानल्यास वरीलप्रमाणेच मूळ कारणाची अपक्रांती होऊन त्यापासून होणाऱ्या कार्याची पुनः हळू हळू उत्क्रांती झाली पाहिजे. आणि असे मानले तर कारण हे अनंत असते हेच खोटे ठरेल.

८) 'कारणाची उत्क्रांती न होता केवळ त्यातील शक्तीची उत्क्रांती मानली' तरी ती शक्ती कारणात आली कोठून? ती स्वाभाविकच मानली तर पुनः वरील प्रमाणेच अनवस्था होते.

(१९)

कारण नष्ट झाल्यामुळे कार्यच कार्याचे कार्य व पुनः पुनः त्याचे कार्य असे होत राहून अत्यंत भविष्यकाली ''काहीतरी सजीव-निर्जीव, विरुद्ध-अविरुद्ध असे एकच कार्य'' झाले पाहिजे आणि असे झाले की उत्क्रांतिवाद खुंटला.

९) 'बरे उत्क्रांती सतत होत राहणार, कधीच संपणार नाही' असे मानले तर उत्क्रांतीला शेवटची अवस्थाच नाही, कोणतीही अवस्था तिची पहिलीच आहे. तर मग कोणत्याच वस्तूची अपक्रांती होता कामा नये. असा अनियमित सिद्धांतच उत्क्रांतीचा नियम म्हणावयाचा काय?

१०) ही सर्व सृष्टीची उत्क्रांती ज्या आकाशात व कालात होते त्या आकाश व कालाची उत्क्रांती कां मानू नये? तसेच गुरुत्वाकर्षण शक्तीची उत्क्रांती होते काय?

याही प्रश्नांना उत्क्रांतिवादात उत्तर नाही. म्हणजेच काही पदार्थ उत्क्रांत होतात तर काही तसेच स्थिर राहतात असे म्हणावे लागेल.

(२०)

मग याला काय सर्व सृष्टीची उत्क्रांती म्हणावयाची? हा उत्क्रांतीचा नियम एकांगी झाला. काहींची उत्क्रांती, काहींची अपक्रांती, काहींचे रूपांतर, काहींचे अखंडत्व या सर्वांना उत्क्रांती हेच नांव द्यावयाचे काय?

११) बरे केवळ द्रव्याचीच उत्क्रांती होते असे मानले तर उत्क्रांतीचे उपादान कारण व निमित्त कारण हे दोन्ही द्रव्यरूप मानावे की द्रव्यरहित मानावे?

द्रव्यरूप मानले तर या दोन द्रव्यांची उत्क्रांती कोणत्या कारण द्रव्यापासून झाली?

उपादान व निमित्तकारण हे दोन्ही द्रव्यरहित मानले तर त्यापासून द्रव्याची उत्क्रांती कशी संभवेल?

१२) आग्रहाने 'द्रव्यच नित्य आहे व त्याची उत्क्रांती होते', असे म्हटले तर द्रव्याच्या एका अवस्थेची उत्क्रांती व एका अवस्थेची अपक्रांती मानावी लागेल (म्हणजेच एका गुणाची उत्क्रांती व एका गुणाची अपक्रांती मानावी लागेल.)

जीवपेशींची उत्क्रांती ?

१३) जीवपेशीतील ज्ञानाची उत्क्रांती होते की शरीराची?

शरीराचीच होते म्हटले तर ज्या शरीरा पासून उत्क्रांती होते ते कारणशरीर हळू हळू अपक्रांत झाले पाहिजे. माशाचा माकड झाला तर मासा नष्ट व्हावयास पाहिजे. माकडाचा माणूस झाला तर माकड नष्ट व्हावयाला हवा होता. (पण माणूसही आहे, माकडही आहे आणि मासेही आहेत.)

असे मानले तर कारणाचे अनादि अनंतत्व कोठे राहिले?

१४) जीवपेशीतील ज्ञानाची उत्क्रांती होते असे, असे मानले तर मासा आणि माणूस यांची ज्ञानशक्ती सारखीच आहे. त्या दोघांनाही स्वतःचे विषय बरोबर समजतात. अनुकूलवेदनीयत्व आणि प्रतिकूलवेदनीयत्व सारखेच आहे. मग ज्ञानाची उत्क्रांती म्हणजे काय?

१५) माशापेक्षा माणसाचे ज्ञान श्रेष्ठ आहे,

असेही म्हणता येत नाही. कारण त्यांचे सुखाचे विषयच भिन्न आहेत. मासा शेवाळे खातो तर माणूस तूप वगैरे खातो. एकमेकांचे विषय एकमेकांना नको असतात.

असे अनेक प्रश्नोपप्रश्न महाराजांनी उपस्थित केले आहेत. यासंबंधी अलौकिक व्याख्यानमालेत दुसऱ्या व्याख्यानात माकडापासून माणूस झाला याचे विस्ताराने युक्तिवादापूर्वक खंडन केलेले आहे.[४]

''या जगापासूनच आपल्या इच्छा उत्पन्न झाल्या आहेत म्हणून या जगातच त्या पूर्ण झाल्या पाहिजेत,'' असे उत्क्रांतिवादी म्हणतात.

वानरापासून मनुष्याची उत्पत्ती झाली याचा अर्थ वानराच्या इच्छा मनुष्य शरीरात पूर्ण झाल्या असे दिसते काय? म्हणून महाराज म्हणतात- हे म्हणणे वेडगळपणाचे आणि बालिशपणाचे आहे.

उत्क्रांतिवादाचा अर्थ असा आहे की वस्तू जशी जशी उत्क्रांत होईल तसतसा तिचा न्यूनपणा कमी झाला पाहिजे. या कल्पना गोड असल्या तरी व्यवहारात तसे मुळीच दिसत नाही. एकदा माणूस

बुद्धीने विकसित असला तरी शरीराने किरकोळच असतो. एखादा शरीराने सुदृढ असला तर बुद्धीने यथातथाच असतो. म्हणून सर्वदृष्टींनी न्यूनपणा कमी होणे कधीच शक्य नाही.

वानराच्या इच्छा मनुष्यशरीरात पूर्ण झाल्या म्हणजे काय झाले? त्याला खातापिता चांगले आले? की शास्त्रज्ञान आले? — कपडे घालण्याच्या, शास्त्रे वाचण्याच्या वगैरे इच्छा त्याला कधीच नव्हत्या. बरे खातापिता चांगले आले, राहणे सुधारले, असेही म्हणता येत नाही. कारण त्याला पूर्वी गरजा कमी होत्या. घराची गरज नव्हती. बायकामुलांचा मोह पडत नव्हता. कुटुंबभरणाची चिंता नव्हती. ऊन, वारा, पाऊस, तहान, भूक या स्थिती सोसण्याची त्याची तयारी होती. फळे,मुळे,पाला खाऊन त्याचे भागत होते. दुष्काळ पडला तरी त्याचेवर मरणाची पाळी येत नसे. त्यामुळे मनुष्यशरीरात येऊन माकडांचे नुकसानच जास्त झाले आहे. त्यांच्या इच्छा वाढल्या आहेत. याप्रमाणे त्यांचे दुःख अधिक वाढले आहे,

सुख कमी झाले आहे. याला उत्क्रांती हे गोंडस नांव दिले तरी काय दिसते?

सुधारणेचे फलित म्हणूनच की काय आजकालच्या अती सुधारलेल्या पाश्चात्य राष्ट्रात न्यूड क्लबस्, समलिंगी विवाह, निसर्गाप्रमाणे राहणे, स्वाभाविक चिकित्सा, निसर्गोपचार वगैरेंची फॅडे निघत आहेत. हवा तेवढा पैसा व सुखाची सर्वोत्तम साधने प्राप्त होऊनही शेवटी ते नकोसेच झाले आहे. रानटी जंगली अवस्था त्यांना आवडू लागली आहे. ज्या जंगली अवस्थेतून तथाकथित मानव उत्क्रांत झाला असे मानले तर ती अवस्था पुन्हा येणे म्हणजे ती उत्क्रांती की अपक्रांती? पाश्चात्य राष्ट्रांमध्ये माकडांचे मानव झाले असतील तर आताची मोकाट हिप्पीसंस्कृती हीच त्यांची उत्क्रांती आहे, असेच ठरवावे लागेल.

बरे बुद्धीची उत्क्रांती होणे हीच खरी उत्क्रांती म्हटले तरी विचित्रच दिसते. अमेरिका व रशिया यांनी अणुशक्तीचा शोध लावला, पण केले काय तर जपानमधील आपल्या सजातीय प्राण्यांची माणसांचीच

होळी केली. अमेरिकेने मनुष्यजातीचा रोगांनी नाश करण्यासाठी व्हिएटनाममध्ये विषारी वायू वापरले. हंगेरीत आधुनिक तंत्रानी देशभक्तांचा छळ केला. जर्मनीने ज्यूंची कत्तल केली. पाकिस्तान्यांनी आधुनिक तंत्र वापरून पशूंना लाज वाटेल असे त्यांच्याच इस्लामधर्मीय बांधवांवर अत्याचार केलेत आणि त्याला या सर्व उत्क्रांत म्हणविणाऱ्या राष्ट्रांनी मनःपूर्वक पाठिंबा देऊन शस्त्रास्त्रे देखील पुरविली.

याप्रकारे राक्षसी प्रवृत्ती वाढणे म्हणजे काय उत्क्रांती म्हणावयाची? भारतीय संस्कृतीत न्याय, दया, करुणा, परोपकार, दुसऱ्यासाठी सर्वस्वाचा त्याग करणे, वगैरेंना सद्‌गुण मानले आहेत. सत्तेच्या हपापाला त्याज्य ठरविले आहे. रामाने रावणाला जिंकले पण त्याचे राज्य बिभीषणाला परत दिले. वालीचे राज्य सुग्रीवाला दिले. कृष्णाने जरासंध, नरकासुर, कंस वगैरेंना मारले पण त्यांचे राज्य बळकाविले नाही. त्यांच्याच पुत्रांना परत दिले. आज इंदिरा गांधीने देखील बंगला देशात हेच केले. ही

भारतीय संस्कृतीची सद्‌गुणवर्धनाची प्रवृत्ती कोणीकडे आणि पाश्चात्यांची स्वार्थी राक्षसी महत्वाकांक्षा कोणीकडे! आपल्या संस्कृतीत **''स्वार्थशून्य सत्ताधीश आणि उपभोगशून्य श्रीमंत''** हेच आदर्श मानले गेले आहेत. ही मानवी उत्क्रांतीची वरची पायरी नव्हे काय?

नीतिमत्ता वाढणे, आध्यात्मिक प्रगती होणे ही उत्क्रांती म्हटली तर ही पूर्वी आधिक होती आणि आज अपक्रांती झाली आहे, हे भारताच्या इतिहासावरून स्पष्ट दिसते. माणसांची परस्पर सहकार्याची भावना वाढणे, द्वेष कमी होणे, विकार नाहीसे करणे, विचारांनी विकारांवर ताबा मिळविणे वगैरेंना भारतीयांनी खरी उत्क्रांती मानलेली आहे. आणि ती देखील स्वाभाविक निसर्गतः होत नसून प्रयत्नाने होत असते. ही **''प्रायत्निक उत्कांतीच'' भारतीय संस्कृतीचा विशेष आहे.**

उत्क्रांति व अपक्रांती हे विश्वाचे रहाटगाडगे आहे. या चक्रांतून सुटण्यासाठी अत्यंत कठोर प्रयत्न

करून यमनियमादिकांनी मनाचे विकार शमन केले पाहिजेत. शरीराला विचारांच्या ताब्यात ठेवून, स्वतः जगाच्या आदिकारणात म्हणजेच परमेश्वरात मिळण्याचा प्रखर प्रयत्न केला पाहिजे.

झडझडोनी वहिला निघ । इये भक्तिचिये वाटे लाग।
तेणे पावसी अव्यंग । निजधाम माझे ।।ज्ञाने.।।

ही नराचा नारायण बनविण्याची प्रायत्निक उत्क्रांतीच खरी उत्क्रांती आहे. आणि पुनः पाश्चात्य मताप्रमाणे ही 'स्वाभाविक' नसून 'प्रायत्निक' आहे. हे लक्षात ठेवले पाहिजे. गीतेत भगवांन म्हणतात -

''नहि कल्याणकृत् कश्चित् दुर्गतिं तात गच्छति ''
''तेषां अहं समुद्धर्ता मृत्युसंसारसागरात्''

''मनःपूर्वक थोडा जरी चांगल्यासाठी प्रयत्न केला तर मनुष्याची दुर्गती होऊ शकत नाही. मृत्युरूपी संसारसागरातून मी त्यांचा उद्धार करतो पण दुष्टांना मात्र आसुरी योनीतच पुनः पुनः घालतो.''

या भगवद्‌वचनात दया आणि न्याय दोन्ही दृष्टीस पडतात. दुसऱ्यांना सुधारण्याची इच्छाही यात

दिसते आणि हट्‌टी व दुर्गुणी लोकांना त्यांच्या कर्माचे फल देण्याचा न्यायही दिसून येतो. त्याचप्रमाणे महाराजांचे एक विधान मोठे मार्मिक आणि विलक्षण आहे. त्यात त्यांचा जबरदस्त आत्मविश्वास व्यक्त होतो. ते म्हणतात-

''आपण यांच्या फार पुढे गेलो तरी त्यांचे विचार तसेच राहणार; म्हणून आता त्यांचे म्हणणे सोडून देऊ....''[४]

अणूपासून उत्क्रांती ?[५]

उत्क्रांती कोठून सुरू झाली याचा विचार करताना कितीही बुद्धी खर्च केली तरी उत्क्रांतीचा पहिला दुवा अणूच (परमाणू) मानावा लागतो. तो ज्ञानरूप की अज्ञानरूप? चेतन की जड? असे प्रश्न उपस्थित होतात. यावर महाराजांनी अलौ. व्याख्यान मालेतील नवव्या व्याख्यानात सविस्तर चर्चा केली आहे. आणि सर्व पाश्चात्यविचारांना त्रुटित दाखवून दिले आहे. महाराजांचे युक्तिवाद शास्त्रीय परिभाषेत आहेत. ते पाहिल्यानंतर आपल्या भारतीय संस्कृतीतील

विचार करण्याची शास्त्रीय पद्धती किती अभेद्य राहू शकते याची किंचितशी कल्पना येते.

उत्क्रांतीचा पहिला दुवा असलेला अणू ज्ञानरूप की जडरूप, याचा महाराजांनी केलेला विचार अगदी थोडक्यात पाहू.

१) ''चेतन अणू हाच उत्क्रांतीचा पहिला दुवा'' मानला तर सर्व अणू चेतन होतील. त्यातील प्रत्येक अणु स्वतंत्र राहील. चेतन म्हणजेच जाणीवसहित म्हणजेच ज्ञानसंपन्न. हे सर्व अणू परस्परभिन्न असल्यामुळे त्यांच्या उत्क्रांतीच्या दिशा भिन्न भिन्नच राहतील त्यामुळे एकाच दिशेने उत्क्रांती न होता, प्रत्येकाला वाटेल तशी त्यांची प्रवृत्ती होईल. त्यामुळे सामुहिक उत्क्रांतीचा प्रसंगच येणार नाही.

२) समजा ''सर्व अणूंचे उत्क्रांतीचे उद्दिष्ट एकच असेल'' तर ही **''समानाभिप्रायवत्ता''** बाहेरील शक्तीच्या अधीन आहे? की उत्क्रांतीचे प्रयोजन प्रत्येक अणूला माहीत असल्यामुळे त्यांची समानाभिप्रायवत्ता आहे? असे दोन प्रश्न उत्पन्न होतात.

३) ''दुसऱ्या शक्तीचा अधीन ते अणू मानले'' तर ते अणू जड मानावे लागतात आणि ती शक्ती चेतन आणि त्या जडाणुहून भिन्न मानावी लागते. म्हणजेच ईश्वरशक्ती मानावी लागते.

४) बरे ''त्या ज्ञानाणूंना संघशक्तीचे प्रयोजन आधीच माहीत असल्याने त्या प्रयोजनाप्रमाणे ते आपणहून उत्क्रांती करणारे असतील'' तर अपूर्ण दशेतच त्यांना पूर्ण ज्ञान असल्याचे दिसेल. मग ज्ञानाच्या उत्क्रांतीचे प्रयोजनच नाहीसे होईल.

अ) ''ज्ञान पूर्ण आहे'' तर ज्ञानाची आणखी उत्क्रांती काय होणार?

आ) ''उत्क्रांती म्हणजे परिणाम समजले'' तर ज्ञानाचा परिणाम ज्ञानाहून भिन्न पदार्थ म्हणजे अज्ञानच मानावे लागेल.

इ) ''ज्ञानाचा परिणाम ज्ञानच'' मानला तर त्या दोन ज्ञानात भिन्नता नसल्याने 'ज्ञानाचा परिणाम

ज्ञान' स्वीकारणे वेडेपणाचे आहे.

५) ''पहिल्या अवस्थेतील अणू जडरूप मानले'' तर त्यांच्यात ज्ञान येणार कोठून? बाहेरून आले म्हटले तर पूर्णज्ञानसंपन्न असे चेतन म्हणजेच ईश्वर मानावा लागतो.

जड अणूच्या अज्ञानात व ज्ञानात कार्यकारण वगैरे प्रकारची कोणतीच शृंखला नसल्यामुळे, जडापासून ज्ञान कसे उत्क्रांत झाले, या प्रश्नाचे उत्तर मिळत नाही.

६) ''जडाणूबरोबर सहवासी ज्ञानाणू मानला'' तर त्यातील आकाशही ज्ञानरूपच मानावे लागते. आणि नंतर तीनही प्रकारच्या ज्ञानात भिन्नता सिद्ध होत नाही म्हणून अनेक ज्ञानाणूतही भिन्नता सिद्ध होऊ शकत नाही. वगैरे अनेक तर्कशास्त्रीय प्रश्न उपस्थित होऊन अनवस्था प्रसंग येतो. असे महाराजांनी शास्त्रीय परिष्कार देऊन विवेचन केले आहे.

स्पेन्सरमत समीक्षा

ज्ञानाचे अणू असंभव

स्पेन्सरने नवीन उपपत्ती काढली आहे की ''काही कल्लोळ मिळून जसा नाद उत्पन्न होतो तसे ज्ञानाचे अणू मिळून उष्णता, ज्ञान वगैरे परिणाम होतात.''

७) या उपपत्तीत ज्ञान म्हणजे दृश्य वस्तू आहे की शक्ती आहे, असा प्रश्न उपस्थित होतो.

अ) ''ज्ञान म्हणजे दृश्य वस्तू आहे'' हे मनात देखील आणता येत नाही

ब) ''ज्ञान म्हणजे शक्ती आहे'' असे मानले तर तिला आधार म्हणून काही तरी जड पदार्थ मानावाच लागतो. तो आधार मेंदू आहे, असे मानले तर जड अणूंचा मेंदू हा ज्ञानाणूंचा संयोगी होतो. - म्हणजे जडात ज्ञान आहे किंवा ज्ञानात जड आहे. या म्हणण्यात काही अर्थच उरत नाही.

८) हा जडाचा व ज्ञानाचा सांधा जुळविण्यासाठी आमच्याकडील एकाने खटपट केली आहे, असे महाराज म्हणतात. त्याने परमाणूच्या तीन अवस्था कल्पिल्या आहेत? १- द्रव्यात्मक,२- गुणात्मक, ३-संस्कारात्मक; यापैकी शेवटची संस्कारात्मक अवस्था चैतन्याचा सांधा आहे, असे म्हटले आहे. यावर महाराजांनी चार प्रश्न उपस्थित केले आहेत.

''ज्ञानावर मिथ्या विवर्तभूत मनःपरमाणूंचा तीव्र संवेग जगत आहे'' असा अर्थ केल्यास वेदान्ताशी जुळते. पण असे करूनही ''जड व चैतन्याचा सांधा जुळू शकत नाही'', हा भारतीय सिद्धान्त तसाच कायम राहतो, हे सविस्तर रीतीने दाखवून दिले आहे. ही अवस्था मिथ्या मानली तर वेदान्ताप्रमाणे विवर्त होतो. पण तरीही त्याचा चैतन्याशी सांधा जुळू शकत नाही.[६]

९) शेवटी सांख्यदर्शनातील सिद्धान्ताप्रमाणे ''संयोग हा परार्थ असतो. स्वघटकभूत एखाद्या पदार्थाच्या उपयोगाकरता नसतो'' आणि म्हणूनच चेतनाचे

स्वातंत्र्य सिद्ध होते, असेही दाखवून दिले आहे.

जडापासून जीवोत्पत्ती...?

प्रश्न - जडापासून जंतू उत्पन्न करण्याची प्रक्रिया पाश्चात्य लोकांस सांपडली आहे त्यामुळे आत्मा उत्पन्न होतो व मरतो असेच मानणे युक्तिसंगत दिसते.

उत्तर :- १) छे, मुळीच नाही उलटे जडातच चैतन्य आहे असेच सिद्ध होते. 'नसलेला पदार्थ कधीही उत्पन्न होत नाही' हा आम्हा आर्याचा सत्कार्यवादच यामध्ये दिसून येतो.

फिजिक्समध्येही हेच तत्त्व आहे – मेणबत्ती जळून जाते पण काहीच नष्ट होत नाही. फक्त परिवर्तन होते.

२) गवत वगैरे कितीही शिजवून टाकले तरी त्यात एक प्रकारचा स्वेद उत्पन्न होऊन त्यामधून स्वेदज प्राणी उत्पन्न होतात अशी आमच्याकडे उपपत्ती आहे.

३) बाहेरून जंतू येऊन तो पदार्थात शिरतो ही उपपत्ती पाश्चात्यांची आहे, आमची नव्हे.

४) मातीपासून सर्वांची उत्क्रांती मानली तर झाडे व प्राणी ही परस्पर भिन्न जीवसृष्टी कशी निर्माण

झाली? उत्क्रांती एकाच दिशेने व्हावयास हवी होती.

५) बरे झाडापासून प्राणीसृष्टी उत्पन्न झाली, असेही म्हणता येत नाही.

६) जीवसृष्टी मातीचे परिणामी-कार्य मानले तर ''दही हे परिणामी कार्य नाश पावल्यावर आपल्या दूधरूपी मूल कारणात मिळत नाही.'' त्याप्रमाणे वृक्ष किंवा मनुष्याची प्राणी मेल्यावर त्यांची माती होता कामा नये. म्हणून माती हे ''परिणामी कारण'' मानता येत नाही.

७) निर्जीव पदार्थाचे सजीव पदार्थ होणे हीच उत्क्रांती मानली तर मूळ कारण अत्यंत निर्जीव होते व पुढे अनंत काळाने सर्वच पदार्थ सजीव होऊन सर्वांची पूर्ण रूपाने उत्क्रांती मानावी लागेल. असे झाले की, सर्वच जण सारखे असल्याने त्यांच्या भिन्न भिन्न जातीही ठरविता येणार नाहीत. -

पण असे होणे शक्य नाही कारण आताच सजीव निर्जीव पदार्थ एकमेकांचे विरुद्ध आढळतात. माणसामाणसातही वैर आढळते. अत्यंत उत्क्रांत झालेला

माणूस दुसऱ्या माणसाविषयी द्वेष बाळगून त्याचा नाश करण्याचा प्रयत्न करीत असतो. म्हणून सर्वांची पूर्णरूपाने उत्क्रांती मानता येत नाही.

जगत्कारण असमर्थ की समर्थ?[८]

जगताचे कारण जड आहे असे मानले तर ते असमर्थ की समर्थ?

१) ''असमर्थ मानले तर'' ते नियम्यरूप होईल व त्याला नियंत्याची म्हणजे परमेश्वराची म्हणजे समष्टी ईश्वराची आवश्यकता लागेल.

२) जगताचे कारण समर्थ मानले तर'' त्याला जगाच्या व्यवस्थेचे ज्ञान असले पाहिजे, कारण अज्ञानाने व्यवस्था होत नाही. आणि तसे मानले म्हणजे ते आर्यांचे चेतनच झाले.[९]

सान्त की अनंत ?

३) ''जगताचे कारण जड असले तर'' ते अनंत म्हणजे पूर्ण आहे, की सान्त म्हणजे अपूर्ण आहे? कोणतेही मानले तरी उत्क्रांती संभवत नाही.

४)''पूर्ण असेल तर'' उत्क्रांती होऊन पूर्ण

होण्याची गरज नाही.

५) ''अपूर्ण असेल तर'' त्यात पूर्ण होण्याची शक्तीच नाही. मर्यादा असलेला पदार्थ अमर्याद कसा होणार? अवयव असलेला पदार्थ निरवयवी पूर्ण कसा होणार?

६) ''पशूपासून उत्क्रांत होत होत मानव झाला.'' असे मानले तर सूज्ञ मानवाला अभिप्रेत असलेली उत्तम नीती पशूचे ठिकाणी स्वाभाविक असलेली दिसून येते. तिचा ऱ्हास मनुष्यात कसा झाला? १- गाय बकरी वगैरे अहिंस्त्र प्राण्यांची प्रवृत्ती हिंसा करून मांसभक्षण करण्याकडे मुळीच होत नाही. २- पशूंना कामविकार नियमित काळीच उत्पन्न होतो. आणि त्यातही त्यांना सजातीय स्त्रीच हवी असते.

३- अशी नीती प्राप्त करून घेण्यासाठी मनुष्यांना पुष्कळ प्रयत्न करावे लागतात. म्हणजे नीतीदृष्टीने मनुष्य पशूंपेक्षा खालच्याच स्तरात आहे की नाही? मग पशूपासून माणसाची उत्क्रांती झाली असे कसे सांगता येईल?

पशूंचे ठिकाणी असलेले ''बल'' मानवात

बऱ्याच कमी प्रमाणात आहे. वाघ, सिंह, हत्ती, मगर, सर्प, वड, पिंपळादि झाडे यांच्यापेक्षा ''आयुष्यही'' कमीच प्रमाणात आहे. बुद्धिजीवी वर्गाची ''जननशक्तीही'' मूर्ख व बलवान लोकांपेक्षा कमीच आहे.

असमर्थं समर्थं वाऽचेतनं विश्वकारणम् ।
आद्ये नियम्यरूपं स्याद् द्वितीये चिद्व्यवस्थितिः ॥११
अनन्तमथवा सान्तं जगतः कारणं जडम् ।
उभयत्रापि नोत्क्रान्तिः पूर्णत्वाच्छक्त्यसम्भवम् ॥१२
नीतिः स्वभावात् तिर्यक्षु याऽस्ति मानवेषु च ।
प्रयत्नेन समुत्पाद्या कथमुत्क्रान्तिशंसनम् ॥१३॥
भविष्यत्येव मे मुक्तिर्यथाकालमुपेक्षया ।
वर्धनं विषयासक्तेरुत्क्रान्तिस्थितिभाषणम् ॥१४॥

(य १२ बाळकृष्णपंत केकरेंना पत्र)

म्हणजे काही गोष्टीत उत्क्रांती व अनेक गोष्टीत अपक्रांती स्पष्ट दिसून येते, म्हणून पशूपासून मनुष्य उत्क्रांत झाला ही कल्पनाच चुकीची आहे. याहून– **कर्मफल भोगासाठी एका जीवाने एका योनीतून**

दुसऱ्या योनीत जाणे हा ''पुनर्जन्माचा गमनागमन सिद्धान्तच'' सर्व दृष्टीने योग्य आणि सत्य ठरतो.

मुक्तीची उपेक्षा करून उत्क्रांतिवादी आपली भोगसक्तीच वाढवीत असतात. आहार-निद्रा-भय-मैथुन या चार गोष्टी पशू व मानवात सारख्याच आहेत, पण मनुष्यात धर्म हाच विशेष अधिक आहे आणि तो धर्म स्वतःहून प्रयत्न केल्याशिवाय साध्य होत नाही. खरी उत्क्रांती धर्मचरणानेच साध्य होते. असा हा –

''भारतीय उत्क्रांतिवाद प्रयत्नसाध्य आहे. पाश्चात्यांप्रमाणे स्वाभाविक नाही.''

उत्क्रांती सान्त की अनंत?

७) उत्क्रांती सान्त मानली तर अनंत काळ होऊन गेल्यामुळे, आतापर्यंत उत्क्रांतीची समाप्ती कां होऊन गेली नाही?

८) कालाचा आरंभ कोणी दाखवीत नाही म्हणून कालाचे स्वरूप अज्ञेय आहे. असे स्पेन्सरचे म्हणणे असेल तर उत्क्रांतीचे स्वरूपही अज्ञेयच होईल.

९) मग उत्क्रांती व अपक्रांतीचा दुवा स्पष्ट

दिसणार नाही त्यामुळे कर्मफळजन्य चक्रच मानणे भाग आहे.

१०) उत्क्रांती अनंत आहे असे मानले तर उत्क्रांतीचा उद्देशच सिद्ध होणार नाही व प्रत्येक दुवा सारख्याच रेषेवर दिसेल.

१- उत्क्रांती व पुनर्जन्म [१०]

१) एका देहातून दुसऱ्या देहात जाणे म्हणजे पुनर्जन्म होय.

२) देह व आत्मा निराळा आहे.

३) अविद्या, काम आणि कर्म यांनी मनुष्य खालच्या किंवा वरच्या योनीत जात असतो.

४) योगी-महात्मे काही कारणाने खालच्या योनीत गेले तरी त्यांचे ज्ञान कायम असते. उदा- जडभरत हरिणाच्या योनीत, नलकुबर वृक्षयोनीत जाऊनही त्यांची पुर्नजन्मस्मृती कायम होती.

५) पण स्वाभाविक कर्माने पुनर्जन्म पावलेल्या पुरुषांना पूर्वजन्माची स्मृती नसते.

६) पूर्वस्मृतीसाठी अमानुष प्रयत्न आवश्यकआहेत.

७) मानुषज्ञान किंवा उत्क्रांत अवस्था बापातून पुत्रात उतरत नाही. त्याला स्वप्रयत्नच आवश्यक आहे.

८) देह दैवपरतंत्र असतो. प्रयत्नाने सत्त्वगुण मिळविला तरच जीव श्रेष्ठ योनीत जातो.

१) एका विशिष्ट पदाची शक्ती दुसऱ्या विशिष्ट पदार्थाला उत्पन्न करून आपले पुढले गुणधर्म अधिक व्यक्त करीत असते.

२) पूर्वीचा स्वभाव नष्ट होत जातो. बापाचे गुण पुत्रात, पुत्राचे नातवात असे गुण वाढत असतात, उत्क्रांत होत असतात.

थियॉसॉफीचा उत्क्रांतिवाद

३) थियॉसॉफीने पुनर्जन्म मानला आहे. (म्हणजेच जीवचेतन व जडाचा भेद स्वीकारला आहे.)

४) आत्मा दुसऱ्या देहात तर जातोच, पण तेथे आत्म्याच्या गुणधर्माचा विकास होत असतो.

५) मनुष्याचा आत्मा खालच्या योनीत जात नाही. असे मानीत होते पण आता -

६) खालच्या योनीत मनुष्याचा आत्मा गेला असता शरीर बदलते तरी मन तेच असते (मानुषज्ञान) असे थियॉसॉफीस्ट मानतात.

परिणामवाद [११]

पाश्चात्यांचा उत्क्रांतिवाद व पौरत्स्य परिणामवाद एक नाहीत.

१) परिणामवादात सत् वस्तूच उत्पन्न होते.

२) तिचा लय होतो.

३) पुरुषाचे मोक्ष हे प्रयोजन आहे.

४) पुरुष नित्य आहे (सांख्यदर्शन)

उत्क्रांतिवाद

१) उत्क्रांत होणे हे पुरुषाचे प्रयोजन आहे.

२) उत्क्रांतीचा लय होत नाही.

३) उत्क्रांत झाले की जीवशक्ती मेल्यावर नाश पावते, असे मानले आहे.

४) काहीनी जीवशक्तीचा नाशाबद्दल संशय दाखविला आहे.

अज्ञेयवाद आणि उत्क्रांतिवाद [१२]

अज्ञेयवाद आणि उत्क्रांतिवाद एकाच स्पेन्सरने मानले आहेत. ''मला अजिबात समजत नाही'' असे अज्ञेयच जर उत्क्रांतीचे प्रयोजन असेल तर हे पहिलेपासूनच सर्वांना माहीत आहे. मग उत्क्रांतीचे प्रयोजनच काय?

उत्क्रांती व अपक्रांती

महाराज म्हणतात की **'मला उत्क्रांतीही मान्य आहे व अपक्रांतीही मान्य आहे. व उत्क्रांतीला मान्यता देऊन अपक्रांतीला संमती न देणे, हे बुद्धीच्या दृष्टीने सभ्यपणाचे नाही. या दोन्हींचा अन्तर्भाव आमच्या गमनागमन-सिद्धान्तात झाला आहे.'**

- याचा अर्थ महाराजांना स्वाभाविक उत्क्रांतिवाद मान्य नसून प्रायत्निक उत्क्रांतिवाद मान्य आहे. म्हणजे प्रयत्नाने जीवाचा ईश्वर होऊ शकतो,[१४] असे महाराज म्हणतात.

स्पेन्सरचा अज्ञेयवाद

महाराजांचे असे मत आहे की स्पेन्सर हा नास्तिक मतापेक्षा आस्तिक मताकडे झुकला आहे.[१५] पण याने जगताचे कारण धर्म, जीव, मन, वगैरे गोष्टींना आणि धर्माचे आधारतत्त्व, या सर्वांना अज्ञेय म्हटले आहे. यावरच महाराजांनी अनेक आक्षेप घेऊन त्याचे मत खोडून काढले आहे. ते म्हणतात की - **ज्ञेय मीमांसा व अज्ञेयमीमांसा या दोन ग्रंथांच्या नांवातच अन्तर्गत विरोध दिसून येतो.**

ज्ञेय मीमांसेत स्पेन्सरने उत्क्रांतिवादाचेच अवलंबन केले आहे. त्यात असे म्हटले आहे की देहापुरत्याच ज्ञानाने आपले भागत नाही म्हणून आणखीही गोष्टींचे ज्ञान पाहिजे; या मुद्यावरून महाराजांनी स्पेन्सरला शुद्ध नास्तिक मताहून वेगळे काढले आहे.

अज्ञेय मीमांसेत धर्म व शास्त्रांचे एकीकरण सांगितले असून ते सर्वप्रकारे अज्ञेयच ठरविले आहे. आकाश, काल, द्रव्य, गती, शक्ती, मन, जीव हे

(४५)

सर्वच अज्ञेय असून या सर्वांचे मूळ अधिष्ठान आहे. पण तेही आपली भावना अनपेक्ष-ज्ञानद्वारा आपणास शिकविते. हे अनपेक्ष ज्ञान म्हणजे केवळ भावना दुसरे काही नाही. असे स्पेन्सरचे मत आहे.

स्पेन्सरमत-समीक्षा

आन्तर्पदार्थ

१) आकाश, काल, द्रव्य, गती, शक्ती, मन, जीव या सर्वांचे अधिष्ठान हे सर्वच जर अज्ञेय आहे, तर एकदेशीय भावनारूप ज्ञान कसे उत्पन्न झाले?

२) भावनेचेही अन्तःस्वरूप अज्ञेयच म्हणाल तर भावनाच नाहीशी होईल.

३) आत अज्ञेय व बाहेर ज्ञान, अशी भावना कशी राहू शकते?

४) हे अज्ञेय एकदेशीय आहे की सर्वदेशीय?

५) अज्ञेय सर्वदेशीय मानले तर एकाच देशाचे ठिकाणी ज्ञानशक्ती स्थित कशी झाली?

६) अज्ञेय एकदेशीय मानले तर सर्वत्र ज्ञान असताना एकाच देशाचे ठिकाणी अज्ञेय कसे राहिले?

(४६)

बाह्य पदार्थ

७) आकाश व काल आहेत की नाहीत? नाहीत म्हटले तर त्यांच्या अस्तित्वाची भावना करता येते व त्यांचे ज्ञान होते (आणि त्यानुसार व्यवहारही होतो) मग त्यांना अज्ञेय कसे म्हणायचे?

८) शक्तीचे अन्तःस्वरूप जरी सांगता येत नाही तरी द्रव्याच्या परमाणूंशी तिचे बरेच तादात्म्य आहे.

९) स्पेन्सरने द्रव्य आणि शक्ती हे दोन भिन्न मानले आहेत आणि त्या आधाराने नास्तिक मताचे खंडन केले आहे. महाराजांनी **सर वुईल्यमच्या** अनुयायांच्या संयोगशक्तीमताच्या द्वारा स्पेन्सरचे खंडन केले आहे. आणि नास्तिकमत खंडन स्पेन्सर कडून बरोबर झाले नाही हे दाखवून दिले आहे. ती संयोगशक्ती परमाणूंचीच मानली तर ते परमाणू स्वयंभू ठरून नास्तिकमतापत्ती कशी येते, हे स्पष्ट केले आहे.

१०) ती अज्ञेयशक्ती सर्व-व्यापी असेल, असे

(४७)

संशयात्मक उद्गार स्पेन्सर काढतो. यावरून स्पेन्सरचा निश्चय कोणत्याच मतावर पक्का झालेला नाही.

त्या अज्ञेय शक्तीला सर्वव्यापी मानल्या-बरोबर ज्ञानशक्तीचाही अज्ञेयशक्तीत समावेश होतो. आणि आर्यपद्धतीप्रमाणे संशय आणि निश्चय हे दोन्ही ज्ञानशक्तीचेच घटक आहेत. म्हणून संशयवादच स्पेन्सरच्या गळी येतो.

११) केवलाच्या अस्तित्वाला अज्ञेय मानले तरी 'अज्ञेय आहे' असे समजणारी शक्ती ज्ञानशक्तीच आहे.

या ज्ञानशक्तीलाच अज्ञेय मानले तर स्वतःलाच अज्ञेय म्हणण्यासाखे झाले.(मग व्यवहार तरी कसा चालेल. पण व्यवहार चालू आहे म्हणून ज्ञानशक्ती अज्ञेय राहू शकत नाही.)

१२) ज्या वस्तूंचे अस्तित्व मानावयाचे त्या वस्तूंचा आभास आपल्या ज्ञानशक्तीला झालाच पाहिजे. त्यावांचून त्या वस्तूंचे अस्तित्वच ठरविता येत नाही.

आभास मानला की ज्ञानशक्ती मानावीच

(४८)

लागते. कारण अज्ञेयाचा अज्ञानात आभास होणे शक्यच नाही. म्हणून ज्ञानशक्ती स्वीकारावीच लागते.

१३) पुनः ही ज्ञानशक्ती क्षणिक आहे की स्वयंभू? क्षणिक मानली तर कोणापासून उत्पन्न झाली? अज्ञेयापासून ज्ञानशक्ती उत्पन्न झाली असे म्हणता येत नाही. कारण ज्ञान हे ज्ञेयानुसार असते. अज्ञेयानुसार ज्ञान कधी संभवतच नाही.

१४) अज्ञेयापासून ज्ञान उत्पन्न होणे म्हणजे अंधारापासून प्रकाश उत्पन्न होतो असे म्हणण्या-सारखे हास्यास्पद आहे.

१५) याप्रमाणे यष्टी १२ तील पहिल्या पत्रामध्ये स्पेन्सर मतावर अनेक प्रश्न विचारून सूत्ररूपाने खंडनही केले आहे.

महाराज म्हणतात, ''ज्ञानशक्ती व्यष्टिरूप असल्यामुळे समष्टिरूप ज्ञानाचे तिजकडून आकलन होत नाही; असे म्हटल्याने ती काय अज्ञेय ठरते?''

१६) ही ज्ञानशक्ती सूक्ष्मरूपाने आपल्यात आहेच. निद्रेत जसे 'ज्ञान आहे' हे कळत नाही पण

(४९)

उठल्यानंतर निद्रेची स्मृती होते, ती काय अज्ञानामुळे? याप्रमाणे ज्ञानशक्ती स्वयंभू आहे. (ती फक्त व्यक्त आणि अव्यक्त होत असते.)

अशा प्रकारचा युक्तिवाद करून स्पेन्सर-वादियांना **स्वयंभू ज्ञानशक्ती मानल्यावाचून गत्यंतर नाही,** हे महाराजांनी मांडले आहे.

१७) जगत्क्रिया करणारी समष्टीतील स्वयंभू महाशक्ती एका सर्वव्यापी सदधिष्ठानावर आश्रित आहे, हेही महाराजांनी युक्तींनी सिद्ध केले आहे.

अनंत : अभावरूप नाही व अज्ञेयही नाही.[१६]

१८) रानटी माणसाची बुद्धी फारच थोडे जाणू शकते. त्या बुद्धीच्या पलीकडील सर्वच अनंत आणि अज्ञेय आहे हे त्याच्या अडाणी बुद्धीला वाटत असते.

१९) खरोखरच ते अज्ञेय राहिले असते तर त्याचे मन सुसंस्कृत झाल्यावर नंतरही त्याला त्यापलीकडे काहीच सांपडले नसते; पण सांपडते म्हणून **'अनंत हे अभावरूप नसून भावरूप आहे'** हेच

(५०)

सिद्ध होते.

२०) रानटी मनुष्याला ज्या गोष्टी अज्ञेय वाटतात त्याच सुसंस्कृत माणसाला ज्ञेय वाटतात.

२१) विश्व अनंत व बुद्धी सान्त असेही म्हणता येत नाही. कारण बुद्धीच्या वृत्ती अनंत आहेत हे पश्चिमेकडेही सिद्ध झाले आहे.

२२) अज्ञेयवाद्यांनी तर बाह्य व आध्यात्मिक सर्व अज्ञेयच ठरविल्यामुळे अज्ञेय म्हणणाराही अज्ञेयच होऊ पाहतो. मग अज्ञेयाचे आकलन ते कसे काय करायचे?

२३) काही अज्ञेयवादी उत्क्रांती मानतात. पण तशाने उत्क्रांतीचा उद्देश काय हे गूढच राहते.

२४) म्हणून **उपनिषद्-गम्य सत्तांशाला धरून असलेलेच आनंत्य** मान्य आहे.

२५) आनंत्याचे जाणणेही अनंतच होत असल्यामुळे **'सत्यं ज्ञानं अनतं ब्रह्म'** हा श्रुतिसिद्धान्तच शेष राहतो.[१७]

(५१)

अज्ञेयवाद.....अनादिवाद

उत्पत्ती असेल पण,
आम्हाला समजत नाही.....उत्पत्ती मुळीच नाही
वस्तू गोचर नसते .....वस्तू गोचर असते.

आम्हाला समजले नाही तरी दुसऱ्या श्रेष्ठ बुद्धीच्या व्यक्तीला समजेल असा अज्ञेयवादात अभिप्राय आहे. पण..... बुद्धीचे सामान्यधर्म सारखेच असतात व विशेषधर्म बदलत असतात यासंबंधी अनेक शंकापरिहार करून बराच ऊहापोह महाराजांनी केला आहे.[१८]

ज्याने अज्ञेयवाद काढला आहे, त्यानेच उत्क्रांतिवादही मानला आहे. तेव्हा 'मला समजत नाही' इतकेच उत्क्रांतीचे संपाद्य असेल तर हे पहिलेपासूनच प्रत्येकाला ठाऊक आहे. मग उत्क्रांती होण्याचे प्रयोजन काय? असा प्रश्न उपस्थित केला असता स्वतःच्याच पायावर धोंडा घातला जातो.[१९]

द्वादशयष्टीतील पहिल्या पत्रात महाराजांनी स्पेन्सरमतवादियांना रोखठोक प्रश्न विचारून या पत्राचा

(५२)

समारोप केला आहे. ते म्हणतात,

तुमच्या मताने सर्वच जर अज्ञेय तर तुम्ही स्वतःही अज्ञेयच झालात. मग देहापुरत्या ज्ञानाने होत नाही. त्यापेक्षा आणखी ज्ञान पाहिजे, असे कशाला म्हटले? जे ज्ञेय कधीच होऊ शकत नाही अशा अज्ञेयाचे ज्ञान पाहिजे, असे म्हणणे म्हणजे वदतो व्याघात् आहे.

शब्दाने सांगता येत नाही म्हणून अज्ञेय वाटले तर ते तुमच्या अज्ञानामुळे! एरवी अस्तित्व असलेले अज्ञेय मुळीच नाही, तसे राहू शकत नाही.

''ज्ञेय-अज्ञेय-अतीत स्वयमानंदरूप तटस्थ असे जगत्कारण आहे आणि त्याचाच आभास हे जगत् आहे'' असा वेदान्तसिद्धान्त सोडून भलतेच प्रतिपादन करून घोटाळ्याचे ग्रंथ लिहीणे हा काय सुबक उपदेश? हे काय मतभेदसहिष्णुत्व?

मलाही कळले नाही व दुसऱ्यासही कळत नाही, असे म्हणून आपले मत कशावरही न देता निसटून जाणे, हे काही गुरुत्वाचे लक्षण नव्हे.

याप्रमाणे परखडपणे स्पेन्सरमताचे अग्राह्यत्व महाराजांनी दाखवून दिले आहे त्याचा आपण थोडक्यात परिचय करून घेतला यासंबंधी अधिक स्पष्ट विवेचन हवे असल्यास महाराजांच्या मूळ लेखनातून समजून घ्यावयास हवे.

संशयवाद

पाश्चात्य समाजात संशयवाद नांवाचे तथाकथित तत्त्वज्ञान पसरत चालले आहे. त्याचा परिणाम आपल्याही देशातील सुशिक्षित म्हणविणाऱ्या बुद्धिमान वर्गावर झपाट्याने होत आहे. असा हा संशयवाद अतिशय घातक असल्यामुळे मुळातच त्याचे उ्गाटन करणे आवश्यक आहे. त्यादृष्टीने महाराजांच्या मूलभूत विचारांचे अवलोकन करणे जरूर आहे.

''एखादी गोष्ट तिन्हीकाळी कशावरून राहील?'' असा संशयवाद्यांचा नेहमीचा संशय असतो.[२०] परंतु–

*व्यवहारातील प्रत्येक गोष्ट नाश पावणारी आहे असे स्पष्ट दिसत असूनही ती खरी आहे, असे

समजून हे संशयवादी देखील व्यवहार करीत असतात.

*डॉक्टरांच्या हातून कधी कधी रोग्यांचे प्राण जातात, हे माहीत असूनही स्वतःवर पाळी आली असता डॉक्टरवर आणि त्याच्या औषधीवर विश्वास ठेवूनच हे संशयवादी चिकित्सा करीत असतात.

*मागे झालेल्या अनेक स्त्रियांनी आपल्या नवऱ्याला फसविले असे जाणत असूनही आपल्या बायकोवर विश्वास ठेवितच असतात.

*मुलाने बापाचा खून केल्याची अनेक उदाहरणे असूनही संशयवादी म्हणविणारा मुलावर 'हा मला मारणार नाही' असा विश्वास ठेवूनच व्यवहार करीत असतो.

याप्रमाणे 'आपल्याला आवडते त्याठिकाणी युक्तीची अपेक्षा न करणे आणि जे नको असते तेथे मात्र संशय घेऊन युक्तीची अपेक्षा करणे' हे काही खऱ्या संशयवाद्याला शोभत नाही.

अन्न, पाणी व जगातील प्रत्येक सजीव निर्जीव पदार्थ शंकाभिराक्रांत असल्यामुळे जीवंत राहणे देखील

अशक्य आहे. म्हणून खरा संशयात्मा सापडणे इहलोकात शक्य नाही.

आता जे संशयवादी म्हणून आहेत, ते सर्व व्यवहारातील सोडून केवळ परमार्थातील सत्याचा अपलाप करीत असतात, कारण त्यांना संसारच हवा असतो परमार्थ नको असतो. अशा या तथाकथित संशयवादाचे महाराजांनी केलेले विदारण पाहण्याजोगे आहे.

१) एखादी गोष्ट तिन्हीकाली कशावरून राहील असा संशयवादाचा नेहमीच प्रश्न असतो.

विशेष गोष्ट तिन्ही काळात राहील असे आर्य तत्त्ववेत्तेही मानीत नाहीत. पण - व्यावहारिक दृष्टीने **'चित्-त्व'** आणि पारमार्थिक दृष्टीने **'सत्-त्व'** तिन्ही काली असलीच पाहिजे. नाहीतर पुढे उत्पन्न होणाऱ्या पदार्थाची ओळखच पटूं शकणार नाही.

२) सदृश पदार्थ नवीन उत्पन्न झाला तर त्याचा कोणत्यातरी जातीत समावेश होतो.

३) अगदी विसदृश पदार्थ उत्पन्न झाला तरी त्याला अस्तित्व राहणारच म्हणजे सत्तारूप जाती

मानावीच लागणार. संशयवादी देखील यातून सुटत नाहीत. त्यांनाही पदार्थाची सत्ता मानावीच लागते.

४) पदार्थ असा होवो की तसा होवो, त्याला अस्तित्व राहणारच.

हे अस्तित्व म्हणजेच 'सत्' होय आणि 'हे सत् त्रिकालाबाधित आहे' असे धर्माचे म्हणणे आहे.

५) बरे सतही कदाचित् राहणार नाही, असे संशयवादी जर म्हणेल तर अभावाचा निश्चय तरी तो मानील की नाही? आणि अभावाचा ''निश्चय'' मानला असता संशयवादाच्या मूळावरच आपत्ती येते.

६) बरे, 'सत्ता सर्वथा नाहीच' असे जर म्हटले तर संशयालाही अस्तित्व राहत नाही.[२१]

संशयाला अस्तित्व नसले तर संशयवादही शून्य होऊन जातो. याप्रमाणे संशयवादी संशयाचे देखील अस्तित्व ग्रहण करू शकत नाही. स्वतःचे देखील अस्तित्व स्वीकारू शकत नाही. म्हणून स्वतःचा किंवा संशयवादाचाही जर निश्चय करू शकत नाही तर त्याच्या प्रतिपादनाला उन्मत्त-प्रलापाशिवाय आणखी

(५७)

कोणते नांव देणार!

समारोप

महाराजांनी सूत्ररूपाने केलेल्या डार्विन व स्पेन्सरमतावरील समीक्षा आपण पाहिल्या. या समीक्षा मुळातून अभ्यास करण्याजोग्या आहेत. ग्वाल्हेरच्या स्वानंदसाम्राज्यकर्ते जठारांच्या पत्रात महाराज शेवटी लिहीतात की,

''जगत्क्रिया करणारी महाशक्ती कोणत्या तरी एका सर्वव्यापी सदधिष्ठानावर अश्रित आहे हे निर्विवाद सिद्ध होते. आता पुष्कळ प्रमाणे देत बसत नाही. विचारवंताने विचार करून आणखी उपपत्ती जुळवून घ्याव्या'' याप्रमाणे महाराजांनी पाश्चात्य मतांचे भारतीय दृष्टिकोणातून कसे मूल्यमापन करावे, यासंबंधी आदर्श उदाहरण घालून दिले आहे.

भारतीय न्यायशास्त्राच्या परिष्कार-पद्धतीचा अभ्यास करून विचार करण्याची संवय लावली की कोणतेही नवीन मत शास्त्रशुद्ध तर्कनिकषावर घासून तावून-सुलाखून पाहिल्याशिवाय चैनच पडत नाही आणि

(५८)

शेवटी न्यायशास्त्राच्या अग्निपरीक्षेतून जे बाहेर पडते तेच खरे बावनकशी सुवर्ण ठरते. असे असल्यामुळे संस्कृत भाषेतील प्राचीन आर्यशास्त्रांचा अभ्यासच सत्याच्या जवळ जाण्यासाठी महत्वाचा आहे असे महाराजांच्या पाश्चात्य विचारवंतांच्या प्रमेयांवर काढलेल्या आक्षेपाने व केलेल्या खंडनाने सहज सिद्ध होते.

संदर्भ-टीपा :- १)उत्क्रांतिवाद पा.२५, ले. इंदुमती पारीख, समाज प्रबोधन संस्था प्रकाशन १४, पुणे १९६३ २)य १२, पा. १-७ ३)अलौ. व्याख्याने आवृत्ती ५ वी प्र २. पा. २३-२६ ४)अलौ. व्याख्यानमाला पा. २६ ५)अलौकिक व्याख्यानमाला व्या.९.पा.१७०-१७४ ६)अलौ.व्या,पा.१७५ ७)साधुबोध प्रश्न ६१० ८)य१२. पा.३०-३१ ९)श्लो ११, य१२, पा. ३०-३१ १०)साधुबोध प्र. ६०८ ११)साधुबोध प्र.६०९ १२)साधुबोध प्र.६०७, १३)साधुबोध प्र. ६१२ १४)य८,पा.३३७ १५)सिद्धिसार य१५,पा.२१५-२३४/ य१२,पा.६-१२ १६)साधु.प्र.६०५-६०६-६०७ १७)साधु. प्र.६०५ १८)साधु.प्र.६०६ (१९)साधु.प्र.६०७ २०)साधु.प्रश्न६०३ २१)साधु. प्र.६०३*(श्रीगुलाबराव महाराजांची विचारसंपदा)*

ooo

(५९)

न्याय दर्शन व वैशेषिक दर्शन

आर्यांचे भौतिक शास्त्र

(भौतिकवादाचे आक्रमण- न्यायशास्त्राचा वेदान्तात उपयोग- शब्दार्थ संबंधाचा स्वीकार- असत्कार्यवादाचे खंडन- ईश्वराच्या सुखदुःखयोग्यतेचे खंडन- अनुमानाचे खंडन व स्वीकार- वैदिक शब्दप्रमाणाचे श्रेष्ठत्व- न्यायावरील आक्षेप व महाराजांची भूमिका- विशेषाची सिद्धी- शास्त्रकारांचा आशय.

न्यायशास्त्र हे भौतिकशास्त्र :- *प्राचीन भौतिक शोध- १)गणित- २)साऊंडची थिअरी- ३)रेडिअम- ४)प्रकाश- ५)इलेक्ट्रॉन थिअरी- ६)ईथर म्हणजेच वायू आणि आकाश- ७)गती, उष्णता व प्रकाश- ८)धातुशास्त्र- ९)विमानविद्या- विज्ञानावरील ग्रंथरचना कशी करावी?*

जुने भौतिक शास्त्रांचे संदर्भ :- *मानसशास्त्र- भौतिकशास्त्र- इंद्रियविज्ञान- गणित- समारोप-*

(श्रीगुलाबरावमहाराजांची विचारसंपदा प्रकरण ३/४ वे न्याय व वैशेषिक दर्शने आवृत्ती २००३ पान ८३)

महाराजांनी न्याय आणि वैशेषिक या दोन्ही दर्शनांविषयी बरेच लेखन केलेले आहे. त्यांनी

(६०)

'न्यायसूत्राणि' नांवाचा संस्कृतात सूत्रग्रंथ रचला असून **'युक्तितत्त्वानुशासनम्'** या नांवाचा दुसराही ग्रंथ लिहिण्याचा उपक्रम केला होता. पण महाराजांच्या अपुऱ्या आयुष्याप्रमाणेच ते दोन्ही ग्रंथ अपुरेच राहिले. न्यायशास्त्रासंबंधीचा त्यांचा पत्रव्यवहार देखील महत्वाचा आहे. त्यातून महाराजांची जुन्या परंपरेला पोषक असणारी नवी दृष्टी प्रतिबिंबित होते.

पूर्वी न्याय व वैशेषिक ही दोन्ही दर्शने भिन्न भिन्न होती. न्यायाचे द्रष्टे महर्षी **गौतम** म्हणजे अक्षपाद असून वैशेषिकाचे महर्षी **कणाद** हे आहेत. न्यायशास्त्रात **प्रत्यक्ष, अनुमान, उपमान आणि शाब्द** अशी चार प्रमाणे मानली असून वैशेषिकात **प्रत्यक्ष व अनुमान** ही दोनच प्रमाणे स्वीकारली आहेत. म्हणूनच वैशेषिकशास्त्र हे मुख्यतः भौतिक दृष्टीने विचार करणारे शास्त्र होते आणि पुढेही याच्याच साह्याने भौतिक शोध लावावेत, असे महाराजांचे मत आहे.

तसेच ज्ञानेश्वरीत - **तर्क तोचि फरशु । नीतिभेद अंकुशु ॥अ.१.११॥** या ओवीत न्यायशास्त्राचा प्रतिपाद्य

(५१)

विषय श्रुतिसंमत असलेला तर्क आहे असे प्रतिपादन केले आहे. या श्रुतिसंमत तर्काच्या साह्याने विचारातील दोष दूर करून अनुमानाच्या साह्याने ब्रह्मप्राप्तीसाठी मनन करावे असा अर्थ माउलीने या ओवीत सुचविला आहे.

नीतिभेद अंकुशु' या चरणात नीतिभेद म्हणजे धर्माच्या अविरोधी असलेली व्यवहारनीती म्हणजेच व्यवहारातील अभ्युदय साधून देणारे भौतिकशास्त्र घ्यावयास हवे.[१]

वैशेषिकांची धर्माची व्याख्या

यतः अभ्युदय-निश्रेयस-सिद्धिःस धर्मः।।वै.सूत्र२.

अशी आहे. अभ्युदय म्हणजे लौकिक संपन्नता आणि निश्रेयस म्हणजे मोक्ष, हे दोन्ही साधून देणारा तो धर्म. असा त्याचा अर्थ आहे.

चार्वाकमतखंडन आणि ईश्वरसिद्धी या दोन्ही महत्वाच्या गोष्टी या दोन्ही शास्त्रात सांगितल्या असल्याने पूर्वीच्या काळी आर्यांच्या भौतिकशास्त्राची प्रगती होऊन देखील नास्तिकता समाजात वाढली नाही.

(६२)

पूर्वी ही दोन्ही शास्त्रे भिन्न भिन्न होती. पण त्यानंतर बौद्धांनी युक्तिवादाचा अवलंब करून वैदिक सिद्धान्तांचे खंडन सुरू केले. तेव्हा भारतवर्षातील सारा समाज ढवळून निघाला. हे पाहून तात्कालीन सनातन धर्माच्या महापुरुषांनी न्याय आणि वैशेषिक शास्त्रांना एकत्र करून **''नव्यन्याय''** शास्त्राची रचना केली. **गणेशोपाध्याय** यांनी **''तत्त्वचिंतामणि''** लिहून नव्यन्यायाची मुहूर्तमेढ रोवली. आणि नंतर न्यायातील प्रत्यक्ष, अनुमान व शब्द खंडांपैकी अनुमानाचा विस्तार केला. आणि सूक्ष्म व सर्वंकष युक्तिवादाच्या जोरावर बौद्ध विचारसरणीला मागे सारले. पुढे नव्यन्यायाच्या तर्कपद्धतीचा आश्रय करून सर्वच शास्त्रकारांनी आपापले सिद्धान्त मंडित केले आणि तत्त्वज्ञानपर ग्रंथरचना केली. त्यामुळे बौद्धांचा प्रभाव समाप्त होऊन पुनः अद्वैतसिद्धान्ताची आणि भक्तीची स्थापना झाली.

भौतिकवादाचे आक्रमण

आधुनिक काळात १९ व्या शतकापासून इंग्रजांनी भारताबरोबरच भारतीय शिक्षण क्षेत्राचाही

(६३)

ताबा घेतला.(इ.सन१८३४) जुन्या पद्धतीच्या जागी पाश्चात्य शिक्षणपद्धती रुजविली गेली आणि तेव्हापासून **आपण भारतीयांनी न्यासंमत युक्तिपद्धतीने नवविचारांची चिकित्सा करणे सोडून दिले आणि पाश्चात्यांच्या भौतिक उन्नतीने दिपून गेल्यामुळे आपल्याला प्राचीनभारतीय विचारपद्धती टाकाऊ वाटू लागली. आणि न्यायशास्त्राचा अभ्यासच बंद पडला.** असे झाल्यामुळे आपले आपल्या प्राचीन भौतिक शास्त्राकडेही दुर्लक्ष झाले.

पूर्वी जसे न्यायातील अनुमान खंडाचा विस्तार होतांच बौद्धांचे नास्तिक मत विरून गेले तसेच आज जर त्यातील प्रत्यक्ष खंडाचा (म्हणजे प्रामुख्याने वैशेषिकशास्त्राचा) विस्तार केला गेला तर आर्यभौतिकशास्त्राची पुनः उन्नती होईल. आपला आर्यावर्त पुनः पूर्वीच्या ज्ञा स्थानावर आरूढ होऊ शकेल. हाच विचार महाराजांनी सविस्तर मांडून दाखविला. हा प्रयत्न कसा करावा, याचे मार्गदर्शनही केले. आधुनिक आणि प्राचीन आर्यभौतिक शास्त्रातील

(६४)

प्रमेयांची चर्चा करून आर्यविचारांचे श्रेष्ठत्व सिद्ध केले. एके ठिकाणी ते म्हणतात -

''नवीन आर्य-भौतिकशास्त्र
आधुनिक पाश्चात्य भौतिक शास्त्राचे
भाषांतर न ठरता,
भाषांतराचे मूळ ठरावे;
असा जोरदार प्रयत्न झाला पाहिजे.''

यासंबंधी त्यांनी अत्यंत महत्वाच्या सूचना दिल्या आहेत, याप्रमाणे महाराजांच्या विवेचनातील विचारांचा खालील क्रमाने परामर्श घेण्याचा आपण प्रयत्न करू.

१) न्याय व वैशेषिक शास्त्रांचे महाराजांनी मानलेले द्विविध स्वरूप व वैशिष्ट्य.
२) या शास्त्रांवर येणारे आक्षेप.
३) या शास्त्रांकडे पाहण्याची दृष्टी.
४) या शास्त्रांचा उपयोग आजच्या काळात कसा करून घेता येईल?

(६५)

न्यायशास्त्राचा वेदान्तासाठी उपयोग

न्यायशास्त्राची अनुमान पद्धती इतकी परिपूर्ण आहे की वेदान्तासकट सर्व शास्त्रांना तिचा फारच उपयोग झाला आहे. यात नास्तिकमताचे संपूर्ण खंडन आणि ईश्वराचे अस्तित्व केवळ अनुमानाच्या जोरावर युक्तीने सिद्ध केले आहे. त्यामुळे ईश्वरोपासना न्यायाच्या अभ्यासाने चांगली दृढ होते.[२]

न्यायातील अनेक-पदार्थवाद सोडून देऊन ईश्वराचा स्वीकार केला की हेच शास्त्र वेदान्ताला पूरक ठरते. वेदान्ताचे श्रुतिपुराणद्वारा श्रवण करावे आणि त्यानुसार पोषक असलेल्या तर्काने त्याचेच मनन करावे.[३]

''आत्मा वा रे, दृष्टव्यः श्रोतव्यः मन्तव्यः निदिध्यासितव्यः ॥''

या श्रुतीनुसार वेदान्ताचे **श्रवण**, न्यायातील अनुमानाने त्याचे **मनन** आणि योगप्रक्रियेने **निदिध्यासन** केले असता, या दर्शनांचा परस्परविरोध नाहीसा होतो आणि आत्म्याचा साक्षात्कार होतो.[४]

(६६)

न्यायशास्त्राचा मोक्ष मिळविण्यासाठी फारसा उपयोग नाही. पण त्याने चार्वाकमताचे खंडन उत्तम प्रकारे करता येत असल्याने मननासाठीच न्यायशास्त्राचा अभ्यास होणे आवश्यक आहे. असे आमच्याकडील सर्व महात्म्यांचे मत असल्याचे महाराज सांगतात.[५]

महाराजांनी वेदान्तदृष्टीने न्यायशास्त्राचे खंडन केले आहे. ते वेदान्तदृष्टीने अपरिहार्य असले तरी देखील एकूण भौतिकशास्त्राच्या दृष्टीने महाराजांनी न्यायाला अतिशय वरचा दर्जा दिला आहे आणि स्वतःच्या मधुराद्वैतदर्शनाची मांडणी करताना आपले सर्व लिखाण न्यायघटित युक्तिवादांच्या चौकटीत बंदिस्त केले आहे. त्यांच्या न्यायघटित भाषाशैलीमुळे त्यांचा भावनेपेक्षा युक्तिवादावर जास्त भर होता हे दिसून येते. इतकेच नव्हे तर 'न्यायसूत्राणि' व 'युक्तितत्त्वानुशासनम्' अशी संस्कृतात त्यांनी ग्रंथरचनाही केली आहे.

(६७)

शब्द-अर्थ संबंधस्वीकार : ईश्वरेच्छा

न्याय व वैशेषिक ही दोन्ही शास्त्रे **''अस्माच्छब्दात् अयं अर्थो ज्ञातव्यः इति ईश्वरेच्छा संकेतः॥''(न्यायमुक्तावलि)** अमुक शब्दावरून अमुक अर्थ जाणावा याचे कारण तसा ईश्वरेच्छारूपी संकेत आहे, असे न्यायमुक्तावलीकार म्हणतात, याच मताचा महाराजांनी स्वीकार केला आहे. आणि यासंबंधी युक्तिवाद करून आधुनिक भाषाशास्त्रातील अनेक आक्षेपांचे क्रमशः आणि विस्तारशः संप्रदायसुरतरूत खंडन केले आहे.[६]

त्यानंतर ईश्वर नित्य आहे, म्हणून त्याची इच्छा नित्य आहे, म्हणून वेदही नित्य आहेत, असे वेदांच्या नित्यतेचे वेदान्त-प्रमेय मांडले आहे. – पण नंतर वेदान्तप्रमेय मांडताना 'शब्द त्रिक्षण स्थायी असतो' या न्यायमताचे खंडनही केले आहे. *रुद्रवीणेने (बीन) शब्दाला अनेक क्षण स्थिर करता येते असे उदाहरणपूर्वक दाखवून दिले आहे. *'कोणताही शब्द ऐकू न आला तरी नाहीसा होत नाही' हे आधुनिक

(६८)

विज्ञानाचे मत सुद्धा प्रमाण देऊन त्याचाही दाखला दिला आहे. *गीतावचन देखील महाराजांच्या म्हणण्याला पुष्टी देते.**''नासतो विद्यते भावो, नाभावो विद्यते सतः ॥''**

असत्कार्यवादाचे खंडन

न्यायानें असत्कार्यवाद मांडला आहे. त्यामुळे - वेद उत्पन्न होतात म्हणून वेद कार्यरूप आहेत व म्हणून वेद अनित्य आहेत. या न्यायमताचे निराकरण करताना महाराजांनी संपूर्ण असत्कार्यवादाचे संक्षेपतः परंतु मुद्देसूद खंडन केलेले आढळते.[७]

ईश्वराची सुखदुःखस्वरूपयोग्यता : खंडन

काही नैयायिकांनी ईश्वराला सुखदुःखाची स्वरूपयोग्यता आहे असे मांडले आहे. त्याला महाराजांनी उत्तर दिले आहे.[८]

सुखदुःखे ही धर्म आणि अधर्म यांची फले आहेत. धर्माधर्म मिथ्या ज्ञानामुळे उत्पन्न होतात. ईश्वराला मिथ्याज्ञान नाही म्हणून धर्माधर्म नाहीत. म्हणूनच सुखदुःखे ईश्वराला स्पर्श देखील करू शकत नाहीत.

ईश्वर स्वतंत्र आहे. त्याला हे करावे व ते करू नये असे विधिनिषेधांचे बंधन राहू शकत नाही. म्हणूनही त्याला सुखदुःखे नाहीत. असे विस्तारपूर्वक मांडले आहे.

अनुमानप्रमाणाचे खंडन व स्वीकार.

वैदिक शब्दप्रमाणाचे श्रेष्ठत्व.

ब्रह्मज्ञान करून घेण्यासाठी अनुमान प्रमाणाचा मननाशिवाय इतरत्र फारसा उपयोग नाही, हे पटवून देताना महाराजांनी अनुमान प्रमाणाचे खंडन केले आहे.[९]

अनुमान हे स्वतंत्र प्रमाणच मुळी नाही कारण ते प्रत्यक्षावलंबी आहे. प्रत्यक्षावरून अनुमान करावे लागते आणि अनुमान खरे की खोटे, हे शेवटी प्रत्यक्षावरूनच ठरते. याप्रमाणे अनुमानाच्या पूर्वी आणि नंतर प्रत्यक्ष असल्याने अनुमानाचे महत्व यथार्थ ज्ञान होण्यात फारच अल्प आहे. - आणि **दुर्जनतोषन्यायाने जरी अनुमानाने ज्ञान होते असे मानले तरी ते 'सामान्य ज्ञान' होते, 'विशेष ज्ञान' होत नाही.**

म्हणून वेदान्तातील शाब्दप्रमाणच अनुमानापेक्षा श्रेष्ठ आहे, असे महाराज म्हणतात.

जसे घट आहे यावरून तो कोण्यातरी कुंभाराने केला असला पाहिजे असे सामान्यज्ञान अनुमानाने होते पण तो अमक्याच कुंभाराने केला हे समजत नाही. त्या विशेषज्ञानासाठी शब्दप्रमाणच स्वीकारावे लागते.

लौकिक शब्दप्रमाण देखील प्रत्यक्षाला अनुसरून असते. पण प्रत्यक्षप्रमाण न्यायानेच खंडित केले आहे. म्हणून लौकिक शब्दप्रमाणाचे ग्रहण येथे होत नाही.

प्रवृत्तिरनुमानस्य कुतः स्यादनुमातरि ।
अतः सर्वप्रमातात्मा चित् वेदान्तेन भावय॥१६॥[१०]

अनुमानाने अनुमान करणारा कधीही जाणला जाऊ शकत नाही. सर्व प्रमाणप्रमेय व्यवहार ज्याच्या जाणीवेवर अवलंबून आहे, असे जे चैतन्य ते वेदान्ताच्या महावाक्याने म्हणजे वैदिक शब्दप्रमाणानेच समजते. याप्रमाणे ब्रह्मप्राप्तीसाठी अनुमानाचे खंडन करून वैदिक

शब्दप्रमाणाला महाराजांनी श्रेष्ठ ठरविले आहे.

न्यायावरील आक्षेप व भूमिका

महाराजांनी माधुर्यमधुकोशकार द.ग.खापरे, मामासाहेब देवरस वगैरे मंडळींना पाठविलेल्या पत्रात न्यायावरील अत्यंत मार्मिक प्रश्न विचारले आहेत, पण त्यांची उत्तरे मागताना ते म्हणतात - ''या प्रश्नांची उत्तरे मला न्यायातूनच हवीत, वेदान्तानुसार नकोत.'' परंतु या महाराजांच्या इच्छेप्रमाणे कोणीही त्यांची उत्तरे न्यायातून काढून दिली नाहीत.

तसेच ''न्यायाचा अभ्यास करताना न्यायातील शब्दांचे अर्थ जसेच्या तसे घेतले जात नाहीत'' यासंबंधी बरीच सविस्तर चर्चा करून व योग्य अर्थांचा ऊहापोह करून चर्चेची दिशा दाखविली आहे. शास्त्रांचा परंपरेनुसार अभ्यास न केल्यामुळे शब्दांचे अर्थ विपरीत समजले जातात आणि तत्त्वबोध होण्याऐवजी वादच वाढतो. म्हणूनच महाराजांनी आपल्या अनुयायांना साक्रेटिसच्या पद्धतीप्रमाणे विचार करण्याची संवय लागावी यासाठी न्यायावर अनेक

आक्षेप घेऊन प्रश्न केले आहेत. यासंबंधी त्यांनी एक उदाहरण दिले आहे -

विशेषाची सिद्धी

१. आकाश, काल, दिशा व आत्मा हे चार पदार्थ विभू होऊ शकत नाहीत, हा आजपर्यंत मी न्यायावर आक्षेप आणीत होतो आणि

२. जीवात्मा विभू असूनही प्रतिशरीर भिन्न कसा, हाही आक्षेप आणीत असतो.

याला न्यायशास्त्रात मुळीच उत्तर नाही असा माझ्या मंडळीचा तरी समज झाला आहे. बहुत काय पण **क्रोडपत्रसंग्रहातून** देखील या प्रश्नाचे उत्तर निघू नये, हे मोठे आश्चर्य आहे. यावरून ''पंडितांची निरनुभव प्रवृत्ती'' व्यक्त होते. या प्रश्नाच्या उत्तराकरता 'दीधिति' सारख्या न्यायग्रंथात बुडी मारावी लागत नाही. तर्कसंग्रह किंवा मुक्तावली सारख्या कुंभानेच उत्तररूपी तृषा शांत होते.

तर्कसंग्रहात सप्त पदार्थात एक **'विशेष'** नामक पदार्थ आहे. तो विशेष नित्य-द्रव्यावर राहणारा असून

(७३)

सामान्यरहित आहे. व्यक्तीचे ठिकाणी जशी व्यक्तित्व जाती आहे, तशी विशेषाचे ठिकाणी विशेषत्व जाती नाही. तर तो विशेषच स्वतः व्यावर्तक आहे.

वरील चारही पदार्थ अति संकर आहेत. त्यांच्या व्यावृत्तीकरता हा 'विशेष' आहे. हा विशेष नसता तर त्यांच्या विभुत्व संस्कारामुळे काल शब्दाचा अर्थ आकाश किंवा आत्मा देखील झाला असता.

हा विशेष 'नित्य' असल्यामुळे व 'नित्यद्रव्यवृत्ती' असल्यामुळे तो विशेष चारही विभु पदार्थांना परस्पर निराळा करणारा आहे.

त्या निराळेपणात देशाची अपेक्षा नाही. कारण जेथे निराळेपणा आहे तेथे देश असलाच पाहिजे असा नियम मूर्त द्रव्यात लागू आहे, अमूर्त द्रव्यास लागू नाही.

नाहीतर जाति व व्यक्तींचे ज्ञान पृथक् होत असून त्यांच्यामध्ये देश मानावा लागेल.

किंवा एकाच घटावर गुणत्व जाती, रूपत्व जाती, द्रव्यत्व जाती, घटादी जाती हे चार सामान्य

(७४)

राहतात. व सामान्याचे लक्षण तर व्यापक असणे असे आहेच; पण एके ठिकाणी राहणाऱ्या चारही सामान्यांना, वेड्याशिवाय कोणीही एक म्हणत नाही व फटही दाखवित नाही.

''परमाणूनां व्यावर्तको विशेषः'' हा विशेष मानल्यामुळेच कणादांना आपल्या शास्त्रास वैशेषिक असे नांव द्यावे लागले. याशिवाय न्यायात व त्यांच्यात काहीच भेद नाही. म्हणून आत्मा वगैरे चार विभु पदार्थ या 'विशेषामुळेच' वेगळे जाणले जातात.''

तात्पर्य, कठीण वाटलेल्या प्रश्नाचे उत्तर महाराजांनी असे थोडक्यात दाखवून दिले.

याचप्रमाणे महाराजांनी न्यायावर आणखीही आक्षेप घेतले आहेत.[१२]

१ - नित्य द्रव्याचे गुण नित्य व कार्यद्रव्य प्रथमक्षणी निर्गुण उत्पन्न होते. या दोहोंचा समन्वय कसा? कारण - कार्यद्रव्य जर निर्गुण उत्पन्न होते तर त्याच्या नित्यपरमाणूतील नित्य गुणांचा ध्वंस होतो काय? नित्यगुण जर कार्यात अनुगत मानले तर

(७५)

कार्यद्रव्य प्रथमक्षणी निर्गुण कसे उत्पन्न होते?

२ - संख्या अनित्य मानली आहे तर नवद्रव्यावरील नवत्व संख्या नित्य कशी?

३ - बरे, संख्या अनित्य असेल तर नवद्रव्यांची पृथक् सिद्धी कशी?

४ - अभावावर 'सप्त' ही संख्या कशी?

याप्रमाणे महाराजांनी न्यायाच्या विरोधी अनेक आक्षेप घेतले आहेत. कारण साक्रेटीसच्या पद्धतीचा अंगीकार करून तशी अनुयायांना संवय लावावी हा त्या आक्षेपामागील खरा उद्देश आहे. ते म्हणतात-

''येवढे मात्र लक्षात ठेवावे की, मी आपल्या ग्रंथात एखाद्या शास्त्राचे खंडन केल्याशिवाय, माझ्या सहज बोलण्यात आलेल्या शास्त्रावरील आक्षेपाने, कोणत्याही शास्त्राविषयी अनादर करून घेऊ नये. - वादीची हुर्यो उडविण्याविषयी माझे काही म्हणणे नाही. पण केव्हा केव्हा असे होते की माझ्या सहज बोलण्यातील आक्षेपाला उत्तर नाही असे समजून त्या

(७६)

शास्त्राविषयी अनादर होतो. – **पण ग्रंथात किंवा विनोदरहित ज्या शास्त्रावर मी आक्षेप काढतो त्याचे मात्र त्या शास्त्रात उत्तर नसते हे मी शपथेवर सांगतो.''**[१३]

याप्रमाणे न्यायावर महाराजांनी आक्षेप काढले परंतु न्यायशास्त्रा-विषयी अनादरबुद्धीचा लवलेश त्यात नाही. आणि आपल्या अनुयायांनी देखील त्या शास्त्राविषयी अनादर करून घेऊ नये, असे ते बजावतात. याविषयी त्यांची जागरूकता पाहून त्यांच्या असीम शास्त्रनिष्ठेविषयी आश्चर्य वाटते.

शास्त्रकारांचा आशय

अशा प्रकारचे विचार मांडल्यानंतर महाराजांनी एका नास्तिकाला दिलेले उत्तर मननीय आहे -

''न्यायशास्त्राने - अज्ञजनांना आत्मप्रतिपत्ती करून देण्यासाठी, स्वतःकडे घेतलेला कमीपणा - त्या शास्त्रकारांचा मोठेपणाच व्यक्त करतो.''[१४]

''हे मूर्ख लोकायत बंधो (चार्वाका), तुला

(७७)

समजावून देण्याकरताच बुद्धी-सुख-दुःख-इच्छा इत्यादींना आत्म्याचे गुण म्हणून नैयायिकांना मानावे लागले आहेत. हे मानण्याची तुला संवय नाही. त्यामुळे तुम्हा लोकायतांना निर्विकार आत्म्याची प्रतिपत्ती होणे दुर्घट झाले आहे. म्हणूनच- अध्यस्त इच्छादिकांचा देखील आत्म्याचे ठिकाणी गुणत्वरूपाने व्यवहार स्थापित करून, इच्छादि विकारसहित आत्म्याला देहाहून पृथक् करून न्यायाचार्यांनी दाखविले आहे.

लहान लेकराकरता बाप जसा असंस्कृत भाषेने बोलला तरी ते जसे गौण होत नाही, उलट ते बालाचे रंजन करणारेच ठरते त्याप्रमाणे तुम्हा बालांचे रंजन करण्याकरता वेदान्ती व सांख्यापेक्षा आपल्याकडे लहानपणा घेऊन भगवान् **अक्षपाद** व भगवान् **कणाद** या महात्म्यांनी तुम्हाला देहभिन्न आत्मप्रतिपत्ती करून दिली आहे.

पुनः त्यांनी हे इच्छादिक गुण अनित्य सांगितले आहेत. नित्य सांगितले नाहीत तेव्हा, ''त्या

(७८)

गुणांचा नाश झाला असता आत्मा निर्विकार तसाच राहतो, असा सूक्ष्म आशयच शास्त्रकारांच्या सांगण्यातून सिद्ध होत नाही काय?''

याप्रमाणे महाराजांनी वेदान्तविरोधी न्यायदर्शनामधील विचारांचे खंडन केले पण त्यातील योग्य तत्त्वांचा स्वीकारही केला.

याप्रकारे वेदान्तदृष्टीने जरी न्यायशास्त्र गौण असले तरी भौतिक दृष्टीने ते जगातील सर्वात जुने असे आर्यभौतिक शास्त्र असल्याचे महाराजांनी सिद्ध केले आहे, त्याचा थोडक्यात विचार करू.

न्यायशास्त्र हे भौतिकशास्त्र

न्याय-वैशेषिक शास्त्रांचे ध्येय जरी मोक्ष असले तरी त्यांनी सप्तपदार्थ आणि सोळा पदार्थ मुख्य मानले असल्यामुळे त्यांचे कार्य तर्कशास्त्र आणि भौतिक शास्त्रांचा विस्तार करणे आहे, असेच दिसून येते. वैशेषिकशास्त्राने मानलेली प्रत्यक्ष व अनुमान ही

(७९)

दोनच प्रमाणे याची उत्तम साक्ष देतात.

तर्कशास्त्राकडे न्यायाचा जोर वाढलाच आहे तो आता द्रव्यगुण निरीक्षणाकडे वाढवावा; येवढेच महाराजांचे म्हणणे आहे.[१५] या शास्त्रातील अनुमानखंडाला जसे पूर्वीच्या पंडिताकडून चालन मिळाले तसे आता पदार्थखंडास मिळणे फार जरूरीचे आहे असे त्यांना वाटते.

वैशेषिकात शब्दप्रमाण मानलेले नसून[१६] प्रत्यक्ष व अनुमान अशी दोनच प्रमाणे स्वीकारली असल्यामुळे त्या शास्त्राने फिजिक्स तयार करण्याला मोठी सवड दिलेली आहे. असेही महाराज म्हणतात. म्हणूनच पुढे ते स्पष्ट शब्दात सांगतात -

''अर्धवट धार्मिक लोकांनी व नव्याबांड तरुणांनी सायंटिफिक धर्माची अपेक्षा करण्यापेक्षा सायंटिफिक वैशेषिक शास्त्राची अपेक्षा करावी असे मी म्हणतो.''[१७]

माझे लिहिणे भौतिकशास्त्रीय लोकांच्या टीकेस पात्र होईल हे मी जाणून आहे. परंतु माझ्या

(८०)

एकट्याच्याच हातून हा प्रयत्न सिद्धीस जाईल असे माझे म्हणणे नाही. सर्व नैय्यायिक पंडितांनी इकडे आता मोर्चा फिरविला पाहिजे, असा माझा आशय आहे.''[१८]

पूर्वी आपल्याकडे अतिशय उज्वल व सुधारलेले भौतिकशास्त्र होते. ठिकठिकाणी विमानादिकांच्या वगैरे कल्पना जुन्या ग्रंथातून चमकणे हेच त्यांची सत्यता व्यक्त करते. बृहत्कथेसारख्या महाकाव्यातून तर भौतिक यंत्रांच्या कल्पना देखील चमकतात.

न्यायातून मटेरियल सायन्स संबंधी नवीन शोध लावावेत. तेवढी शक्ती न्यायात आहे.

न्याय बुद्धिनिरूपणावर जो वाढला आहे, तो बुद्धी-इतर पदार्थ निरूपणावर वाढविला पाहिजे. त्यासाठी सर्व आस्तिक-नास्तिकांनी एक होऊन मासिके, वर्तमानपत्रे, पुस्तके काढली पाहिजे. आणि ५०.६० वर्षात याने अभ्युदय दृष्टीसही पडेल. भौतिक

(८१)

अभ्युदय वाढविण्यास हा एक प्रभावी मार्ग आहे.[१९]

संस्कृत पंडितांनी अशा प्रयत्नांच्या दिशेने एखादा समाज काढून आपल्या सूक्ष्म बुद्धीचा इकडे उपयोग केल्यास लोप पावलले आर्य लोकांचे भौतिकशास्त्र पुनः उदयास आल्यावाचून राहणार नाही.'' असा महाराजांचा दांडगा विश्वास आहे.[२०]

इतक्या आत्मविश्वासाने महाराजांनी भौतिक शास्त्राच्या उन्नतीसाठी मार्ग दाखवून दिला असेल तर त्यांनी स्वतःच ते कार्य कां केले नाही, असे वाटणे स्वाभाविक आहे. परंतु त्यासंबंधी त्यांचे उद्‌गार अतिशय स्पष्ट आहेत. आपल्याला जरी वेदान्तापेक्षा भौतिक प्रगती श्रेष्ठ वाटत असली तरी संतांची मानसिकता व त्यांची जीवनमूल्ये अगदी भिन्न असतात. त्यामुळेच आपण नवशिक्षित लोक संतांच्या परमार्थाला समाजपराङ्‌मुखता म्हणत असतो. त्यांचा आध्यात्मिक पिंड न जाणल्यामुळे आपण त्यांच्यावर आरोप करीत असतो. अगदी हीच स्थिती या ठिकाणी सुद्धा झालेली

(८२)

आहे.

महाराज स्पष्ट सांगतात - **''या विषयावर स्वतंत्र ग्रंथ लिहिण्याची मला सवड नाही कारण माझा आवडता विषय भक्ती व वेदान्त आहे. तेव्हा माझ्या सूचनेप्रमाणे होवो किंवा अन्य सूचनेप्रमाणे होवो, नैय्यायिकादी पंडितांनी मिळून हे कार्य करावे आणि 'भाषांतराच्या मुळाप्रमाणे' त्याला शोभा आणावी; हे त्यांचे कर्तव्य आहे असे मी समजतो.**[२१]

हे महाराजांचे उद्‌गार संतांच्या आध्यात्मिक भूमिकेला अनुसरून आहेत म्हणूनच संतांकडून भौतिकशास्त्राची अपेक्षा न करता, समाजातील अन्य बुद्धिमान व अभ्यासू वर्गाकडूनच आर्य-भौतिकशास्त्राच्या प्रगतीची अपेक्षा महाराजांप्रमाणे सर्वांनी करावी हेच खरे!

(८३)

प्राचीन भौतिक शोधांचे संदर्भ

महाराजांच्या वेळी वेदातील वायूच्या स्तुतीतील काही मंत्र देऊन भौतिक हवेचे तंत्र आर्यांना कळले होते, असे अनुमान केसरीतील एका लेखात काढले होते. पण अशी अनुमाने काढून भौतिकशास्त्र आपल्याकडे होते. हे म्हणणे अभिमानद्योतक असले तरी हास्यास्पद आहे. कारण वस्तऱ्याची स्तुती देखील वेदमंत्रात आहे, तेव्हा वस्तऱ्यांसंबंधी काय विशेष शोध आर्यांना असल्याचे अनुमान काढावे?

वेदाने केलेली वायूची स्तुती असो, की वस्तऱ्याची स्तुती असो, ती देवता समजून किंवा तदुपहित चैतन्य समजून केली आहे. पुढे महाराज म्हणतात- **''ज्यांचा धर्मावर विश्वास नाही त्यांच्या हातून अशा रीतीने कां होईना, वेदपुस्तकांचे रक्षण होणे, काही निव्वळच वाईट नाही.**[२२]

याप्रमाणे धार्मिक दृष्टी सोडून देऊन, अगदी नवीन दृष्टीने पाहिले तरी पूर्वीच्या ग्रंथात अनेक भौतिक

(८४)

शोध होते हे महाराजांनी बऱ्याच ठिकाणी दाखवून दिले आहे. ते नाममात्र पाहू -

१) गणित

नव्या शिकलेल्यांचे मत आहे की हिंदुस्थानात परार्धाच्यावर गणित करण्याची रीती नव्हती पण हे म्हणणे अगदी चुकीचे आहे. याचा सविस्तर ऊहापोह एका पत्रामध्ये महाराजांनी केलेला आहे.[२३]

२) साऊंडची थियरी

तंत्रशास्त्र, वैद्यकशास्त्रातील प्रयोग, ज्योतिष, पुराणातील गणित, व्याकरणावरील महाभाष्य, कैय्यटांची शब्दोपपत्तीतील द्रव्यगुणकर्माच्या उपपत्ती वगैरे अनेक ठिकाणी **शब्दोपपत्ती** म्हणजेच **साउंडची थियरी** आलेली आहे.[२४]

३) रेडियम

नवीन नव्यन्यायमतात तेजाचे प्रकार सांगितले आहेत. **'उद्‌भूतरूप उद्‌भूतस्पर्शवत् आकारज तेज'** - **म्हणजेच रेडियम** आहे, असे न्यायमताप्रमाणे सिद्ध होऊ शकत असल्याचे महाराज म्हणतात.[२५]

४) प्रकाश

प्रकाशाची उलटण्याची प्रक्रिया विष्णुपुराणात आहे. **'यान्ति प्रतिपमुपयान्ति'** श्लोकातील या पदांवरून प्रकाशाला गती आहे आणि किरणांचे परावर्तन होत असते हे आपल्याकडे पूर्वीच ठाऊक होते.[२६]

न्यायशास्त्रातही प्रकाश फैलण्याविषयी काही नियम आहेत- तमाला **'आलोकाभाव'** असे न्यायाने स्पष्ट म्हटले आहे.

विवरणप्रमेय संग्रहात बिंबप्रतिबिंबवादाची मांडणी करताना विद्यारण्यांनी प्रकाशासंबंधी काही नियम दिले आहेत. पण या सर्वांची अभ्यासपूर्ण मांडणी आवश्यक आहे.

५) इलेक्ट्रॉन थियरी [२७]

यासंबंधी जुना संदर्भ पाहण्यासारखा आहे. यष्टी ७ मध्ये १८४ पानावर माहिती आली आहे.

६) इथर

पाश्चात्य भौतिक शास्त्रात वायू हा ऑक्सीजन, नायट्रोजन वगैरे अनेक गॅसेस मिळून झाला आहे, असे

मानले आहे. – पण न्यायशास्त्रात वायूला शुद्ध म्हटले आहे. या दोहोंत न्यायाचे **'त्वाचप्रत्यक्षत्व'** हे वायूचे लक्षणच कसे लोप होते, हे बिनतोड युक्तिवादांनी महाराजांनी सिद्ध करून दाखविले आहे.

भौतिकशास्त्रात साऱ्या विश्वात सर्वगत आणि कंपनरूप असे **'ईथर'** पसरले आहे असे मानले आहे. न्यायात वायूचे सर्वगतत्व आणि कंपनरूपत्व आर्यांना मान्य आहे.

भौतिक शास्त्रात ईथरचे दोन प्रकार केले आहेत. स्थिर व कंपनरूप. तसेच योगवार्तिककारांनी आणि काही नैयायिकांनी आकाशाचे परमाणू मानले आहेत. त्यामुळे -

* **वायुतत्त्व** म्हणजे कंप पावणारे ईथर.
* **आकाशतत्त्व** म्हणजे कंप न पावणारे स्थिर ईथर.

असे हे आकाशाचे लक्षण आणि वायूचे लक्षण दोन्ही प्रकारच्या ईथरशी जुळते. न्यायातील पदार्थांचे भाषांतरच जणूं काय ईथर आहे, असे महाराज मांडून

दाखवितात व त्यासंबंधी त्यांना आत्मविश्वासही आहे. महाराज म्हणतात -

'ज्याला माझे म्हणणे भाषांतराच्या मुळाप्रमाणे सिद्ध करणारे वाटत नसेल तर त्याने आपले म्हणणे खरे करून दाखवावे, असे मी आव्हान करतो.'[२९]

७) गती, उष्णता व प्रकाश[३०]

गतीचा परिणाम उष्णता व प्रकाश आहे हे (पाश्चात्यांचे) म्हणणे श्रद्धामात्र आहे. विशिष्ट संख्या व गतीने प्रकाश उत्पन्न होतो असा हेतूही सायंसला देता येत नाही. कारण १) प्रकाशात गती अनुगत राहते म्हणून, २) शिवाय गती ही प्रकाशात आरंभक आहे? परिणामी आहे? की विवर्त आहे? असे प्रश्न उपस्थित करून महाराजांनी प्रतिपक्षाला कुंठित केले आहे आणि शेवटी ''याप्रमाणे लाईटची थियरी आपल्या न्यायशास्त्राकडूनच बरोबर सांगता येते'' असे ते म्हणतात.

८) धातुशास्त्र

धातुशास्त्रासंबंधीही थोडेसे विवेचन यष्टी.७,

पा.१८७ वर आले आहे.

९) विमानविद्या[३१]

पूर्वी आपल्याकडे भौतिकशास्त्र अतिशय उज्वल व सुधारलेले होते. ठिकठिकाणी विमानाच्या कल्पना आपल्या ग्रंथातून चमकणे, हेच महाराजांच्या म्हणण्याच्या सत्यतेचे उदाहरण आहे. बृहत्कथा सारख्या महाकाव्यातून तर भौतिक यंत्राच्या देखील कल्पना चमकतात.

शंभरशंभर योजने जाणारे यंत्राचे विमान दोघे सुतार तयार करीत होते अशी कथा आहे.

कलिंगसेनेला मयकन्येने जे विमान दाखविले होते त्यात वायुप्रधान, जलप्रधान व अग्निप्रधान इत्यादी निरनिराळ्या प्रकारच्या व्यवस्था असल्याचा उल्लेख आहे.

याठिकाणी लक्षात ठेवण्यासारखी गोष्ट ही की यांत्रिक विमाने व देवविमाने या दोहोत पूर्वीचे लोक समता मानीत नसत. दैवी विमानाची व यांत्रिक विमानाची शक्ती निरनिराळी होती असा स्पष्ट दंश

(८९)

बृहत्कथेत दाखविला आहे.

'दैवी विमानकल्पनेपेक्षा यांत्रिक विमानाची कल्पनाच तेव्हाच्या लोकांना अधिक पटत होत्या' असे अनुमान काढून महाराजांनी तत्कालीन लोकांच्या समजुतीला यांत्रिक बुद्धीचा आधार मानला आहे. हे महाराजांचे अनुमान सुसंगत वाटते. अशा प्रकारे पूर्वी अतिशय सुधारलेले भौतिक शास्त्र आपल्याकडे होते असे निश्चित म्हणता येते.

सध्याच्या विमानात व पूर्वीच्या विमानाच्या कल्पनेत साम्य आहे. पूर्वी पंख लावून उडण्याची कल्पना होती व तत्कालीन विमानांनाही पंख होते तशीच आजचीही विमाने पंखयुक्त आहेत. म्हणून पूर्वीच्या विमानकल्पनेचा आज विकास झाला असे म्हणता येते.

याप्रमाणे पूर्वी आपल्याकडील भौतिकशास्त्र अतिशय सुधारलेले असूनही सध्या मात्र त्याची परंपरा अगदी नष्ट झाली आहे. ती पुनरुज्जीवित करण्यासाठी न्यायातील पदार्थ खंड कसा वाढवावा? आणि ग्रंथरचना कशी करावी? यासंबंधीही महाराजांनी मार्गदर्शन केले आहे.

(७९)

नांवाकरता परंपरागत सचोटी दाखवावी लागते तेव्हाच ते कुळ पुढे हजारो पिढींना सन्मार्ग दाखविणारे होते.

हक्सले, टिंडाल, जेम्स वगैरे जडशास्त्रज्ञांचे ग्रंथ पाठ करून एखादा संस्कृत ग्रंथ लिहिला तर लिहिणारा गुणग्राहक व अव्याहत श्रम करणारा आहे असे कोण म्हणणार नाही! पण अखेर, ते ठरणार वैश्याचेच काम![३३]

ग्रंथ कसे असावे?

भारतीय परंपरा उज्वल राखण्यासाठी इंग्रजी ग्रंथाची केवळ भाषांतरे करू नयेत तर **''इंग्रजी ग्रंथांचे मूळ ही संस्कृत रचना आहे'' असे वाटणारी ग्रंथ निर्मिती झाली पाहिजे.** यासंबंधी महाराजांनी जगदीशचंद्र बोसांचे उदाहरण दिले आहे.[३४]

जगदीशचंद्र बोस यांनी आपल्या 'संवेदना' ग्रंथात '**एकं सत् विप्रा बहुधा वदन्ति** ।।' ही श्रुति प्रमाण घेतली आहे. फिजिक्स, फिजियालॉजी व सायकॉलाजी ही युरोपात तीन निरनिराळी शास्त्रे मानली जातात, त्यांचा भेद बोसांनी नाहीसा करून,

(९०)

विज्ञानपर ग्रंथरचना कशी करावी?

''आपल्याला भौतिकशास्त्राविषयी संस्कृतात ग्रंथरचना करावयाची असल्यास ती **भाषांतराच्या मूळाप्रमाणे झाली पाहिजे. मूळाचे भाषांतर नको.''**

हे मार्गदर्शक सूत्र महाराजांनी आग्रहाने मांडले आहे.[३२]

ग्रंथ कसे नसावेत?

'काही ग्रंथकारांनी विचित्र प्रयत्न केले आहेत. त्यामुळे वैशेषिक व जडशास्त्र यांना कायमचे वैकल्पिकत्व आले आहे. न्यायावर 'न्यायप्रदीप' नांवाचा एक नवीन ग्रंथ झाला आहे. यात न्यायाचे तात्पुरते सर्व विषय आले असून ग्रंथकाराने पाश्चात्य समन्वयाची खटपट केली आहे. ती ग्रंथकाराच्या विद्वत्तेची दर्शक असली तरी महामुनी अक्षपाद व कणाद यांच्या कीर्तीला उज्वल करणारी नाही.

स्वतःचे नांव करून घेणे गौण (वि)कर्णाला देखील सुलभ आहे. तेवढ्याने तो स्वतः योग्यतेस चढला तरी कुळाचे नांव होत नसते. कुळाच्या

(९२)

तिन्ही शास्त्रे एकाच शक्तीचे निरनिराळ्या विवक्षेने निरूपण करतात, असे त्यात दाखविले आहे.

आमच्याकडे या तिन्ही शास्त्रांचे पूर्वीपासूनच एकत्र निरूपण चालत आले आहे.

चार्वाकाच्या भूतचतुष्टय वादात फिजिक्स व फिजियालॉजी यांचा थोडासा रासायनिक दृष्टीने विचार आला आहे.

न्यायशास्त्रात फिजिक्स, फिजियालॉजी व सायकॉलॉजी या तिन्ही शास्त्रांचा समावेश असून एकत्र अभ्यास केला आहे. **दीधिति** या न्यायाच्या ग्रंथात तर मनाला भौतिक सुद्धा मानले आहे व तसा सविस्तर विचार केला गेला आहे.[३५]

जगदीशचंद्र बोसांच्या उदाहरणाप्रमाणे प्रथम वैदिकश्रुती प्रमाण घ्यावी, नंतर न्याय वैशेषिक आणि इतरत्र संस्कृत वाङ्मयात पसरलेल्या भौतिक शास्त्रातील प्रमेयांचे आधार घेऊन नवीन शोध लावावेत. म्हणजे ते ग्रंथ भाषांतराच्या मूळाप्रमाणे होतील, असे महाराजांनी स्पष्ट दाखवून दिले आहे.

(९३)

पूर्वमीमांसा आणि वेदान्त सोडून इतर दर्शनकारांनी एखादी सामान्य श्रुती आपल्या म्हणण्याच्या पुष्ट्यर्थ देऊन आपल्या बुद्धीने लावलेले नवीन शोध, नवे विचार मांडले आहेत आणि त्या त्या शास्त्रांचा विस्तार केला आहे. त्यामुळे वैदिक परंपरेला न सोडता, धर्माला विरोध न येता त्या त्या शास्त्रांचा विस्तार झाला आहे. हीच गोष्ट येथे लागू केल्यास आर्यभौतिक शास्त्राचा उदय खास होईल.[३६] शिवाय -

१- ''आर्यांचा व अनार्यांचा विरोध धर्मात असो पण ऐहिक विद्येत असण्याची काही आवश्यकता नाही.''

२ - 'मनुस्मृतीच्या कुल्लभट्टाविकृत टीकेत प्रत्यक्ष फल देणाऱ्या विद्या आर्येतरांपासूनही घ्याव्यात, असा आशय दाखविला आहे.

३ - महाभारतातील कचदेवयानी आख्यान तर अगदी हेच शिकवते.

४ - तसेच 'पूर्व मीमांसेतील **'म्लेच्छशब्दप्रामाण्य विचार'** हा या भौतिक शास्त्राविषयी नाही तर काय धर्माकरता प्रमाण मानावा?' असे महाराज विचारतात.

(९४)

याप्रमाणे आर्यग्रंथ आणि वैदिक मंत्र यांचे साह्य घेऊन न्यायशास्त्रातील प्रत्यक्ष खंडात नवीन शोध लावून पाश्चात्य ग्रंथांना मूळरूप शोभतील अशी आर्यभौतिक शास्त्रांची पुनर्रचना करावी असे महाराज आग्रहपूर्वक प्रतिपादन करतात. महाराजांच्या निर्वाणाला आज शतक झाले आहे पण अजून तसा सामुहिक प्रयत्न केला गेला नाही हे आपल्या भारताचे दुर्दैव होय. शिकस्तपूर्वक प्रयत्न केला गेल्यास यश नक्कीच येईल असे महाराजांच्या भौतिकशास्त्रीय विवेचनावरून वाटते.

प्राचीन संदर्भ

आर्यभौतिक शास्त्राच्या पुनर्निर्मितीसाठी जुन्या आर्यग्रंथातून कोठून काय घ्यावे व कोणत्या ग्रंथांचा अभ्यास करावा ते सामान्यरूपाने महाराजांनी सांगितले आहे.

* अग्निपुराण * विष्णुपुराण
* तत्त्वचिंतामणि (नव्यन्यायग्रंथ - गंगेशोपाध्याय)
* उपदेशसाहस्त्री (शंकराचार्य) / इथर व इलेक्ट्रॉन

(९५)

* गोविंदपादाचार्य (रसग्रंथकार)
* वराहमिहीर
* व्याकरण महाभाष्य. पतंजलि.
* कैय्यट (शब्दोपपत्ती)
* सिंघली भाषेतील 'मायामतय' नामक बौद्ध ग्रंथ.
* पुराणातील गणित
* शुक्रनीती (भूमिती वगैरे गणित)
* भास्कराचार्य (गणित)
* रुद्रयामल तंत्र व इतर तंत्र ग्रंथ
* चार्वाकाचा भूतचतुष्टयवाद- फिजिक्स व फिजियालॉजी यांचा रासायनिक दृष्टीने विचार
* जैन ग्रंथ * बौद्ध ग्रंथ * वैद्यकशास्त्रातील प्रयोग
* धातुशास्त्र * वास्तुशास्त्र * शिल्पशास्त्र * दीधिति (न्यायग्रंथ) * न्यायशास्त्रातील द्रव्यगुणकर्माच्या उपपत्ती
* कथासरित्सागर : द्रव्यगुणकर्माच्या उपपत्ती

वेदान्ताचा **रूपासंबंधी गुणवाद** व सांख्यांचा **रूपद्रव्यवाद** एकत्र केल्यास **परमाणूंचे कंपन म्हणजे प्रकाश** सिद्ध होईल पण त्यासाठी स्वतंत्र ग्रंथ लिहिला

(९६)

पाहिजे, असे महाराज म्हणतात.

वरीलप्रमाणे लहानशी यादी दिलेली आहे. त्यात विखुरलेले भौतिकशास्त्र एकत्र करून त्याला महर्षी कणादांच्या वैशेषिक शास्त्राची जोड लावावी.[३७]

तसेच न्यायशास्त्रातील कोणता भाग कोणत्या आधुनिक शास्त्रात जाऊ द्यावा यासंबंधीही महाराजांनी विभागणी केली आहे[३८]

मानसशास्त्र

काल, मन, आत्मा, आकाश, बुद्धी, इच्छा, द्वेष, सुख, दुःख, प्रयत्न व संस्काराचा भावना नांवाचा भेद, इतका भाग मानसशास्त्राकडे सोपवून द्यावा.

भौतिकशास्त्र

पृथ्वी, आप, तेज, वायू व दिशा हे पांच; द्रव्य, रूप, रस, गंध, स्पर्श, परिणाम, पृथकत्व, संयोग, विभाग, परत्व, अपरत्व, द्रवत्व, स्नेह, शब्द आणि स्थितिस्थापकता व वेग हे संस्काराचे भेद; उत्क्षेपण, अपक्षेपण, प्रसारण, आकुंचन व गती हे पांच कर्म इतक्यांचाच विचाराने भौतिकशास्त्र पुरे

करावे.

इंद्रियविज्ञान

स्पर्श, रस, गंध इंद्रियविज्ञानात जाऊ द्यावे.

गणित

संख्या, परिणाम, परत्व, अपरत्व ह्यांचा गणितात समावेश करावा.

शेवटी उरलेले बाकी सर्व भौतिक शास्त्रात जाऊ द्यावे.

समारोप

याप्रमाणे संदर्भ ग्रंथ आणि न्यायशास्त्राचे आधुनिक पद्धतीने महाराजांनी केलेले विभाग आपण पाहिले. याप्रमाणे लहानसा आलेख महाराजांनी तयार करून दिला आहे.

महाराज एके ठिकाणी असे म्हणतात की, **''आपली कल्पना जरी सध्या बाल्यदशेत आहे तरी टिटिभाप्रमाणे प्रयत्न केल्यास अशक्य काहीच नाही.**[३९]

या सर्वांना वैशेषिक शास्त्राची जोड लावली म्हणजे खरोखरीच मोठे आणि पाश्चात्य भौतिक

जसा उपयोग आहे. तसाच भौतिक प्रगतीसाठी देखील उपयोग आहे हे महाराजांनी सिद्ध करून दिले आहे आणि त्यासाठी मार्गही दाखवून दिले आहेत.

हे मार्गदर्शन बुद्धिजीवी वर्गाला पटले तर या शास्त्राची ''**यतो अभ्युदय-निश्रेयस-सिद्धिः स धर्मः**'' ही व्याख्या पूर्णपणे सार्थ असल्याचे महाराजांनी आपल्या विवेचक पद्धतीने मांडलेले दिसून येईल व त्याचा नव्या पिढींना उपयोग निश्चितच आहे.

.....

संदर्भ-टीपा :-

१)ज्ञानेश्वरी गूढार्थ दीपिका भा.१, ले.श्रीबाबाजीमहाराज पंडित, पा.१४-१६ २)निदिध्यासनप्रकाश अ.७,य.१,पा.१३४. ३)य.१पा.८३. ४)य.७,पा.४६ ५)य.७,पा.२३१. ६)संप्रदायसुरतरू अ.८,पा.२४२-२४३/पा.२६६-२६७. ७)संप्र. अ.८ पा.२७९, अ.२१, पा. ३०६-३१२. ८)संप्र.अ.२१,ओव्या १२३-१२८, पा. २७५/ सांख्यसुरेंद्र य. १४, पा. २५४ -२५५. ९) पत्र २८ य ७, ७९-८०. १०) य. ७, पा ८४. ११) य. ७, पा. १३२-१३३. १२) पत्र १८, य. ७, पा. १३१-१३ १३) पत्र १८, य. ७. पा. १३२-१३३. १४) संप्रदायसुरतरू अ. २१, पा. २५९. १५) य. ७, पा. १८७. १६) य. ७, पा. २३२. १७) य.

विज्ञानाला सर्वथा मूळरूप असलेले स्वयंपूर्ण आर्यभौतिकशास्त्र तयार होईल.

आणि ते नास्तिकमत खंडन करणारे आणि ईश्वराचे अधिष्ठान असलेले भौतिकशास्त्र राहील.''

हेच आजच्या मानसिक असंतुलनाच्या युगात फार महत्वाचे आहे. असे करण्याने लौकिक अभ्युदय आणि निश्रेयस म्हणजे मोक्ष या दोन्हीकडे मानवाची प्रगती एकसारखी समतोल राहील. आधुनिक समाजातील मानसिक असंतोषाची बीजे फार मोठ्या प्रमाणात कमी होतील. आणि मानवाला भौतिक सुखे व त्याबरोबरच मनाला शांत ठेवणारा धर्म या दोहोंची प्राप्ती होऊ शकेल. धर्म, अर्थ, काम व मोक्ष हे चारी पुरुषार्थ मानवाच्या आवाक्यात येतील. ही मानवाची फारच मोठी पूर्णतेकडील वाटचाल राहील.

यासाठी आस्तिक नास्तिक सर्व तरुणांनी आणि विद्वानांनी सामुहिक प्रयत्न करावयास हवा. असा महाराजांनी केलेल्या विवेचनावरून अर्थ निघतो. एकूण काय तर न्याय-वैशेषिक-दर्शनांचा वेदान्तासाठी

७, पा. १८८, १८) य. ७, पा. १३५. १९) य. ७, पा. १४३-१४४ २०) य. ७, पा. २३१. २१) य. ७, पा. २३ २२) य. ७, पा. २३१. २३) य. ७, पा. १८१-१८२. २७) य. ७, पा. १८४. २८) य. ७, पा. २३२. २९) य. ७, पा. २३४. ३०) य. ७, पा. १८५-१८७ ३१) य. ७, पा. १३५-२३७. ३२) य. ७, पत्र २२, पा. १४७-१५२. ३३) य. ७, पा. १४७. ३४) य ७, पा. २३८, ३५) य. ७, पा. २३८. ३६) य. ७, पा. २३८. ३७) य. ७, पा. २३६. ३८) य. ७, पा. १८१. ३९) य. ७, पा. १८१

ooo

(श्रीगुलाबरावमहाराजांची विचारसंपदा प्र.३/४.न्याय व वैशेषिक दर्शन)